म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 9296
7E42

# अनामिका

ना. घ. देशपांडे



REFBK-0007837
REFBK-0007837

১১।২।৫৩

# अनामिका

( कवितासंग्रह )

REFBK-0007837
REFBK-0007837

स्थळ प्रत

वामन नारायण देशपांडे

किंमत अडीच रुपये

प्रकाशक :
वामन नारायण देशपांडे,
टिळकवाडी, यवतमाळ
( मध्यप्रदेश )

सर्व हक्क लेखकाच्या आधीन
प्रथमावृत्ति,
जून १९५२

मुद्रक :
न. वि. सरदेशपांडे,
आदर्श मुद्रणालय,
३९५।५ सदाशिव, पुणें २.

# अनुक्रमणिका

**प्रेमपरः—**

संजीवन—


| | | | |
|---|---|---|---|
| १ ( चिरंतन सौंदर्य ) | ... | ... | १ |
| २ ( सौंदर्यधर्म ) | ... | ... | २ |
| ३ ( चांदण्यांतील धुकें ) | ... | ... | ३ |
| ४ ( प्रीतीच्या उगमाकडे) | ... | ... | ,, |
| ५ ( नवखा शब्द ) | ... | ... | ७ |
| ६ ( स्वप्नभेट ) | ... | ... | ८ |
| ७ ( प्रतिमा ) | ... | ... | ९ |
| ८ ( अवेळीं ) | ... | ... | ,, |
| ९ ( दोन कलश ) | ... | ... | १० |
| १० ( फोल तप ) | ... | ... | १२ |
| ११ ( महाश्वेता ) | ... | ... | ,, |
| १२ ( आत्मसमर्पण ) | ... | ... | १३ |
| १३ ( मला 'दीप' म्हणणारीस) | ... | ... | १५ |
| १४ ( प्रेमाचें कारण ) | ... | ... | १६ |
| १५ ( धागे ) | ... | ... | १७ |
| १६ ( भग्नजीवन ) | ... | ... | १८ |
| १७ ( विकल्प ) | ... | ... | १९ |
| १८ ( स्वप्नबोध ) | ... | ... | २० |
| १९ ( तुझें नाम ) | ... | ... | २१ |
| २० ( असें कसें ? ) | ... | ... | २२ |
| २१ ( पश्चिमेकडून ) | ... | ... | २३ |
| २२ ( पहांटतारा ) | ... | ... | ,, |
| २३ ( पाहिल्यानें ) | ... | ... | २४ |
| २४ ( त्रिविध सौंदर्य ) | ... | ... | ,, |
| २५ ( संजीवन ) | ... | ... | २५ |
| २६ ( ही ) | ... | ... | ,, |
| २७ ( आजची भैरवी ) | ... | ... | २६ |

कथनपरः—


| | | | |
|---|---|---|---|
| २८ पतिता * | ... | ... | २७ |
| २९ गडावरील पुनव * | ... | ... | २८ |
| ३० तरलेले वेद * | ... | ... | ३१ |
| ३१ क्षमा * | ... | ... | ३४ |
| ३२ अमृतकुंभ * | ... | ... | ३८ |


नाट्यपरः—


| | | | |
|---|---|---|---|
| ३३ आदिनारी | ... | ... | ४२ |
| ३४ तीन आवाज * | ... | ... | ५२ |
| ३५ मृत्युकिरण | ... | ... | ५४ |
| ३६ कुत्र्याची तंगडी | ... | ... | ५९ |
| ३७ विचारांचें बंड | ... | ... | ६२ |
| ३८ स्वप्नदृश्य | ... | ... | ६६ |


विविधः—


| | | | |
|---|---|---|---|
| ३९ होतांच उजळ आभाळ ! * | | ... | ७१ |
| ४० कलेचा जन्म * | ... | ... | ७२ |
| ४१ अपुरी माळ * | ... | ... | ७३ |
| ४२ ध्यास * | ... | ... | ७४ |
| ४३ उग्र हो ! | ... | ... | ७५ |
| ४४ आशा * | ... | ... | ७६ |
| ४५ विचारांचें गाणें | ... | ... | ,, |
| ४६ विद्ध हरिणी | ... | ... | ७७ |
| ४७ चक्रपरिवर्तन | ... | ... | ७८ |
| ४८ माती | ... | ... | ७९ |
| ४९ तेजाची तरवार * | ... | ... | ८० |
| ५० खिस्ताचा खटला | ... | ... | ८१ |
| ५१ ओसाडींतील वेल | ... | ... | ८२ |
| टीपा | ... | ... | ८३--८७ |

क्र. 6830

## संजीवन–एक भावकथा

१ छंद–पादाकुलक

वस्तुगत सौंदर्याच्या
पलीकडे वसणारें,
वस्तुगत सौंदर्याचा
मूलस्रोत असणारें,
चिरंतन सौंदर्य तें
अव्यक्तींच व्यक्त होतें ! १

वस्तुगत सौंदर्याला
रुचिभेदें जखडलें :
या देशाचें त्या देशाला
संगीत न मानवलें !
चिरंतन सौंदर्याला
भेदाभेद कैंचा आला ! २

वस्तुगत सौंदर्याला
शाप क्षणजीवित्वाचा :
बहार न टिकतसे
दिनभरी सुमनांचा !
चिरंतन सौंदर्यास
नाहीं ऱ्हास, नाहीं नाश ! ३

चिरंतन सौंदर्या ! रे
छंद तुझा घेई मन,

वस्तुगत सौंदर्यात
तुझें घडूं दे दर्शन !
प्रसाद हा भक्तावर
होऊं दे रे निरंतर ! ४

२ : : छंद—चंद्रकांत

अभिनव मानतों मी सौंदर्यधर्म :
निरामय आनंद हें तयाचें मर्म.
वस्तुगत सौंदर्यातें रोज पहावें,
चिरंतन सौंदर्याला त्यांत शोधावें,
घडीभर आनंदाची घ्यावी प्रतीति
—उपासना या धर्माची सुलभ किती ! १

विश्वामधें सौंदर्याला कमती नाहीं,
ठायीं ठायीं आविष्कार तयाचा होई.
जातां थोडें दूरवर गांवाबाहेर
दिसूं लागे गर्द राई, निळे डोंगर.
नाहीं ना रे गेलें कुठें नभ पळून ?
—तें वरच्या घरीं दिसे खिडकींतून ! २

प्रतिदिन सौंदर्याचें घेतां दर्शन
क्षण तरी आनंदांत गुंगतें मन;
‘ कुरूपता ’ हळूंहळूं हद्दींची सरे,
हळूंहळूं सुंदरता तयांत भरे !
म्हणूनच मानतों मी सौंदर्यधर्म :
निरामय आनंद हें तयाचें मर्म ! ३

३ : : छंद—पादाकुलक

थांब, थांब घडीभरी जाण्याची न करी घाई
हृदय असें अलौकिक पुन्हां काय दिसों येई ? १
पहा ! धुकें चांदण्यांत मिसळलें फिकें फिकें
चराचरीं सौंदर्याची नवलाची आभा फांके ! २
आहों उभे कड्यावरी खालीं दऱ्या खोल खोल
उंच उंच हे सुळके डोकावती भोंवताल ३
चांदण्यांत मिसळलें धुकें दऱ्यांमधें पडे
तयांचिया भव्यतेला रम्यतेचा साज चढे ! ४
तेंच धुकें सुळक्यांना बिलगून लपेटतें
तयांच्याही भव्यतेला रम्यतेची शोभा देतें ! ५
चांदण्यांत मिसळल्या धुक्यामुळें जादु होई :
भव्यतेंत—रम्यतेंत— भेदभाव नुरे कांहीं ! ६
रम्यतेचें—भव्यतेचें— पाहून हें एकपण
चिरंतन सौन्दर्याची पटतसे येथें खूण ! ७

४ : : जाति—शुभगंगा

१

अनंत विश्वें रूपा आलीं जिच्यांतुन,
कवणे काळीं जिच्यांत होतिल तीं लीन,
आदिशक्तिचें त्या हो कोणा आकलन ?
—भिन्नपणानें तिला पाहती भिन्न जन ! १

‘ सत्य ’ गमे ती बुद्धिबलें तिज आकळितां,
‘ सुंदर ’ वाटे भावबलानें उपासितां;

' सत्य ' रूप तें उग्र !–न मजला मुळिं सह्वे !—
बुद्धिबल कसें मज मतिमंदा लाभावें ! २

आदिशक्तिला भजतों–पुजतों भावबळें,
' सुंदर ' ऐसें मनोमन तिला आकळिलें.
पहा कुठेंही–वरतीं, खालीं, चहूंकडे,
सौंदर्याच्या तिच्या प्रभेचें पडे कडें ! ३

पसरे सुंदर निळें निळें हें गगन वरी,
सुंदर तारा तयांत फिरती नवलपरी;
सुंदर अवनी, सुंदर तिजवर गिरी गिरी,
सुंदर सुंदर नद्या घुमविती दरी दरी. ४

सुंदर सुंदर जीव—जयांतें नच उपमा;
मानवामधें सौंदर्याची परिसीमा !
मानवहृदयीं वसते अद्‌भुत ' जाणीव ' :
आदिशक्तिचा म्हणूं मूर्त आविर्भाव ! ५

सुंदरतेच्या अशा उघडिते जी खाणी,
कशी नसे ती सौंदर्याची अधिराणी ?
आदिशक्तिच्या चिर रुचिरत्वा जाणून
तिज ' सुंदरता देवी '—देतों अभिधान ! ६

सुंदरते ! तूं दैवत माझें, मी भक्त,
तुझ्या सेवनीं आजन्मच मी आसक्त !
तुझ्यावांचुनी धर्मकर्म मी नच जाणें
तुझ्या यशाचें एकच गाणें मनिं वाणे ! ७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नों. क्र.

ब्रह्मांडांतिल सुषमेची तूं चिर शोभा,
नयनाल्हादक तेजाची तूं चिर आभा !
सुरासुरांना तुझाच लागे ध्यास सदा,
मानवासही दुजी न चित्तीं आस कदा ! ८

यामिनीमिषें अलकभार तव कुरळ रुळे,
त्यांत गुंफिलीं नक्षत्रांचीं चटक फुलें !
विहगकूजनीं मधुर मधुर तव रव उमगे,
कलाकार-हृदिं तव हृदयाची धडधड गे ! ९

—ध्यान तुझें हें परम मनोरम आठवतों,
मानसपूजनिं तुझ्या अहर्निश मी रमतों;
स्पर्श मम मना सौंदर्याचा तव व्हावा,
प्रसाद मजला हाच देवते ! तूं द्यावा ! १०

२

सुंदरते ! तूं निसर्ग आधीं निर्मियला,
मानव नंतर तुवां घातला जन्माला
निसर्गामधें येथें-तेथें सौंदर्य
भरुन ठेवलें;—तुझें केवढें औदार्य ! ११

परि सुंदरता निसर्गातली पहायला
नव्हतें विश्वीं 'जाणीव' कुणी असलेला
वस्तुवस्तुमधिं अंश अंश तव जो राहे,
आदिशक्तिला तुज उच्चरवें तो बाहे : १२

"ऊठ, ऊठ गे करी मानवा निर्माण,
मम सौन्दर्या कोण जाणता तयाविण ?"

—प्रसन्न झालिस परिसोनी ही आळवणी
सजलिस मानव भूवरि ध्याया पाठवुनी १३

सृजिशी आत्मे दोन दोन तूं स्वतांतुन :
नर एकाला, दुज्यास नारी कल्पून;
जन्म घ्यावया तयां सांगशी धरेवरी,
—मानवजातिस तुवां निर्मिलें अशापरी ! १४

आत्म्यांलागीं भूवरि जातां वदशी तूं :
" जा आत्म्यांनो ! न धरा कांहीं मनिं किंतू !
' जाणीव ' दिली तुम्हांमधें मीं ठेवून
वस्तुवस्तुंतिल सुंदरता घ्या विलोकुन. १५

" तुम्हांमधेंही असे ठेविलें सौंदर्या
नरास नारी, नारीला नर मोहाया.
तुमच्यांतिल या सुंदरतेनें अधिकतर
विश्वामधल्या सुंदरतेला ये बहर ! १६

" आत्म्यांनो ! मी निर्मी तुमचें जें युगल,
प्रीति तयाच्या हृदयामाजी उमलेल !
प्रीति आपुली तुम्ही करोनी घ्या सफल
—एक जन्म त्या पुरेल अथवा न पुरेल ! १७

" प्रेमपूर्तिनें दिव्य दृष्टि ये साचार,
सौंदर्याचा होइल नित साक्षात्कार !
प्रेमपूर्तिनें एकरूपता पावून
मिळाल अंतीं तुम्ही मजमधें येऊन ! " १८

—सुंदरते ! तूं ' मंत्र ' सांगशी जो कानीं,
कितीक आत्मे जपुन ठेविती तो स्मरणीं !
स्मरे न कोणा मंत्र, कुणा ' जोडीदार ',
मानवांमधें म्हणुनच हो हाहाःकार ! १९

जीवेंभावें करील जो तव उपासना
स्वयेंचि त्याच्या होइल अवघें ज्ञात मना :
' मंत्र ' स्मरुनी स्मरेल त्या ' जोडीदार ';
पुढचें कथि कुणि कसें !—तूंच गे ने पार ! २०

५ : : छंद–पादाकुलक ( त्रिपदी )

जीविताचा कोलाहल
सदा चाले भंवताल;
—जीव त्यांत बुडे खोल ! १

एकाएकीं तयांतून
शब्द ऐकूं ये नवीन
—कोलाहल लोपे क्षण ! २

शब्द कोण वदतसे !
नच कळे–नच दिसे !
परी जीवा जडे पिसें ! ३

ज्या प्रेयाचा जन्मवरी
ध्यास घेई मी अंतरीं,
त्याचा कां हा शब्द तरी ! ४

त्यावांचून मन कसें
शब्दें त्या हो खुळें–पिसें !
—प्रेय कधीं नेत्रीं दिसे ? ५

प्रेया ! मूर्त रूप घेई,
मजपुढें उभा राही,
बोल मग शब्द कांहीं ! ६

शब्द तुझ्या मुखांतोनी
पडतांच माझ्या कानीं
सुफलता ये जीवनीं ! ७

६

: : जाति–हरिभगिनी

भेट आपुली जेव्हां झाली सखये ! पहिली–वहिली ग,
आपाद तुझी मूर्ती तेव्हां परिचित मजला गमली ग ! १
नवल केवढें !– कधिंही आधीं नसे देखिलें तुजला ग
बोटोबोटीं परिचित मग तूं कशी वाटलिस मजला ग ? २
तोंच आठवे : अनुद्‌बुद्ध मन झोंपेंत सदा भ्रमतें ग,
दूरदूरचे प्रत्यय अद्‌भुत मला आणुनी देतें ग ! ३
याच मनानें भ्रमणिं कुठें तरि तुला पाहिलें असेल ग,
याच मनानें तुझें वेड मम जिवा लाविलें असेल ग ! ४
म्हणुनच जेव्हां भेट जाहली अपुली पहिली–वहिली ग
आपाद तुझी मूर्ती तेव्हां परिचित मजला गमली ग ! ५

७ : : सुनीत: छंद—गजवदन

विज्ञानामधली
ऐकिली कल्पना :
सूर्य आभासच
वाटे कुणा कुणा;
खरा सूर्य वसे
दूर अंतराळीं
प्रतिमा मात्र ही
तयाची आभाळीं !

त्यापरी सखे ! कां
असशी प्रतिमा
चिर सौंदर्याची
तूं मनोभिरामा ?

मजीवन—नभा
येशी द्याया आभा ?

८ : : छंद—परिलीना

आलीस अवेळीं देवी ! मंदिरीं
सुख कीं दुःखच मानूं अंतरीं ? १
किती दिवस गे वाट पाहिली,
मंदिरीं पावलें नच वाजलीं ! २
रिकामें मंदिर तुजवांचून,
रिकामेंच मज सर्व जीवन ! ३

जीवनसंध्या ही     अखेर येई
निरर्थक आतां     तुझें येणेंही ! ४
हीच वेळ तुज     कशी रुचली ?
अवेळींच कशी     कणव आली ? ५
कवणेपरीनें     स्वागत करूं ?
जीवनदेवीतें     कसें आदरूं ? ६
हार कधींचा गे     गेला सुकून,
नीरांजन तेंही     गेलें विझून ! ७
हात उचलेना     गात्रीं ये शीण,
अश्रु घे मानून     हे दोन—तीन ! ८
तिमिर वाढता     दाटे लोचनीं
पैलतीराहून     हांक ये कानीं ! ९
समय पातला     मज जाण्याचा,
तोच परी तुझ्या     आगमनाचा ! १०
सार्थक न झालें     येऊनही तूं,
विफल जाहला     जीवित—हेतु ! ११
अवेळीं तूं कशी     येशी मंदिरीं ?
सुख कैचें ?—भरे     दुःख अंतरीं ! १२

९ : : छंद—निर्झरगीत

अंगणामधें     प्रभा फांकली
नयनदलें     क्षण मिटलीं ! १
विजेचा लोळ     काय म्हणावा ?
तुटता तारा     काय गणावा ? २
लोचनपुट     मीं उघडिलें,
नवल थोर     दिसून आलें : ३

सं. क्र. ११

प्रकाशांतून देवता कुणी
प्रगट झाली लावण्यखनी. ४

दोन सोन्याचे दोन करांत
दिव्य कलश होते शोभत ५

मंद हांसली अवलोकूनी
मृदु मधुरा वदली वाणी : ६

" प्रीति मजला जनीं म्हणती,
प्रसन्न झालें तुजवरतीं ७

आलें द्यावया कलश दोन
घे हा सुधेचा ! "– ऐसें म्हणून ८

कलश एक दिधला हातीं,
धन्यता चित्तीं वाटली किती ! ९

" भाग्य केवढें !–" बोललों गिरा,
तोंच ती म्हणे, " थांब रे जरा ! १०

हर्ष न मानी त्या कलशाचा
हा घे दुसरा हलाहलाचा ! ११

अमृतापरी हलाहलही
प्रीतीमाझारी भरून राही ! " १२

तोही कलश दे माझ्या करीं :
कुंठित मती जाहली पुरी ! १३

स्पर्श होतांच विष–पात्राचा
व्हावया लागे दाह अंगाचा ! १४

देवतेलागीं मीं विचारलें :
" वर कीं शाप ?– काय हें झालें ? " १५

न बोलतांच मंद हांसली,
अंगणीं पुन्हां प्रभा फांकली ! १६

अंतराळांत हो अंतर्धान,
कलश मात्र उरले दोन ! १७

—शोकावेगानें हृदय उले,
धरणीवरी अंग टाकलें !

१० : : छंद—'बादल'

तपस्विनी—मंदिरीं तीव्र तप—आचरी :
मूर्तीपुढें—बसूनी पूजी तिज—गीतांनीं
किती काळ—लोटला खंड नच—गीताला !
पाषाणाच्या—मूर्तीला पाझर कां—फुटला ?
प्रसन्न ती—होईना, वर कांहीं—देईना !
काय तप—तियेचें विफलच—व्हायचें !

गान तिचें—ऐकून आला कुणी—धांवून.
काय योग !—तो तिला पाहतांच—गुंगला !
तोही गाई—गीतातें पूजूं लागे—तियेतें
मूर्तींत ती—रंगली, तदाकार—जाहली !
ती न सोडी—मूर्तीला, तो न सोडी—तियेला !
काय तप—दोहोंचें विफलच—व्हायचें !

११ : : सुनीत; छंद—लवंगलता

बाणा ! तुझी पूर्वी मज वाटली अन्यथा
पुंडरीक—महाश्वेता यांची प्रेमकथा !
सांगशी तूं : यदृच्छेनें भेटे पुंडरीका
एकदांच महाश्वेता गंधर्वकन्यका
आणि तिच्या प्रीतीमुळें हृदय फुटून
एकाएकीं पुंडरीक पावला निधन !

'प्रीतीमुळें कुणा कसें येईल मरण ?'
—महाकवे ! घेतलें मीं तुजला हंसून !

पटली रे आतां कथा पटली समूळ,
आशाहीन प्रीति असे शुद्ध हलाहल ! १०
तोच पेला नियतीनें लाविला ओठांशीं
मृत्यूवीण दुजी गति आतां उरे कैशी ?
पुंडरीका प्रीतिलाभ हो जननान्तरीं
लाभेल कां 'महाश्वेता' माझी तशी तरी ?

## १२ : : छंद—वंशमणि ( बदलून )

निळ्या नभीं निळी निशा येत
दिव्य तेजें जाहलीं उदित,
झगमगतात !
नवलाची तयांत चांदणी
नक्षत्रांची जशी काय राणी ! १

होता एक शलभ भूवर
स्वैरपणें फिरे भिरभिर
— न ठरे नजर !—
'तेज—वेडा' म्हणती तयास
दिव्यत्वाचा घेई निदिध्यास ! २

अवाचित नक्षत्रांची राणी
शलभास दिसली नयनीं

जाई वेडावोनी !
तिजवीण न सुचे दुसरें,
तिजसाठीं तिळतिळ झुरे ! ३

' चांदणीस शलभ भुलला '-
हेंच पुरे जगा हंसण्याला !
—कळतें त्याजला !-
एक वृद्ध शलभ बोलला,
" सोड बा रे सोड या वेडाला ! " ४

म्हणे तया दीपकाची ज्योती,
" झड घे रे तूं मजवरतीं
—न द्युती कमती !-
जाळूनच घ्यायचें तुजला,
मग इवी चांदणी कशाला ? " ५

कुणी कांहीं, कुणी कांहीं बोले,
शलभाचा उपहास चाले !
तोंच त्या गमलें—
' चांदणीही मिचकावी डोळे !
तिजलागीं प्रेम ना रुचलें ! ' ६

खिन्नपणें स्वतांशीं वदला,
" जगा ! हांस खुशाल मजला !
—कोण पुसे तुला ?-
परी मज चांदणी हांसते,
हेंच शल्य हृदयीं सलतें ! ७

" चांदणी गे ! तूं दिव्य असशी
प्रीति माझी न रुचे तुजशीं—
हें कळे मजशीं !
परी कसें आवरूं मन्मन ?
कसे पाश तुटावे तोडून ? ८

" तव पदीं सर्वस्व वाहावें,
हेंच एक मजलागीं ठावें !
—तेणें धन्य व्हावें ! –
सुखें टाक पूजा लाथाडून !
—कसलीही आतां अपेक्षा न ! " ९

एके रात्रीं होऊन उन्मन
करावया आत्मसमर्पण
घे नभीं उड्डाण !
पुनरपी न दिसे भूतलीं
ठाऊक न काय गत झाली ! १०

कुणी म्हणे, " चांदणी वांकून
तेजोकरीं घे त्या उचलून
करुणा येऊन ! "
कुणी म्हणे, " तो गेला जळून
अंतरींची आग भडकून ! " ११

१३ : : जाति–हरिभागिनी ( बदलून )

मी दीप खरा गे दीप खरा !
स्नेह संपुनी वातहि सरुनी मावळणारा जरा जरा ! ध्रु०

अंवतीं भंवतीं कोंदटलें तम,
मंद मंद हो दीपकळी मम
वाहुं लागला दक्षिणवायू एकाएकीं भराभरा ! १

न कळे केव्हां जाइन लोपुन !
—धीर कुठवरी धरील मन्मन ?
निर्वाणीचा समय पातला आतां तरि गे करी त्वरा ! २

ये, ये वेगें सखये ! धांवुन,
स्नेहाचें करि मजवरि सिंचन;
वात सारुनी ज्योत पालवी आड धरुनिया निज पदरा ! ३

तरीच संतत तेवत राहिन,
तुला—जगाला—प्रकाश देइन :
—प्रकाशांत त्या एकटक तुझी पाहिन मूर्ती मनोहरा ! ४

ना तरि भरली अंतिम घटका,
पाश तोडुनी अवघा तटका
महताब्या त्या जलांत विझविन आग जाळि जी मदंतरा ! ५

## १४ : : जाति—दयिता

प्रेम तुजवरी कां करितों—कसें तुला सांगावें ?
हृदय तुजपुढें मी माझें कवणेपरि उकलावें ? १
दिव्य तुझें सौंदर्य असे, दिव्य तुझी प्रज्ञाही,
परंतु केवळ तयांमुळें प्रीति उपजली नाहीं ! २
सौंदर्याची—प्रज्ञेची—जगतीं काय उणीव ?
दुज्या ठिकाणीं कां माझा ओढ न घे मग जीव ! ३

तुझिया चरणांवरती मी सर्वस्वातें वाहीं—
एकच कारण मजलागीं याचें दिसुनी येई : ४
जननान्तरिंचे असतिल गे लागेबांधे अपुले,
प्रेम म्हणोनी तुझ्यावरी असेल माझें जडलें ! ५
प्रीतिस माझ्या मज न दिसे पैलतीर कोठेंही,
ऐलतिराला परताया शक्ती उरली नाहीं ! ६
अघटित असल्या प्रीतीचें कारण दुसरें कसलें ?
—जननान्तरिंचे हे अवधे लागेबांधे अपुले ! ७

## १५ : : जाति– राजसा

१

" तव आजवरीचें जीवन
नच अडलें होतें मजविण !
कां इथुनहि न तसा राहशी ?
कां नवीन धागे जोडशी ? " १

२

" मम आजवरीचें जीवन
किति अडलें होतें तुजविण !
तूं आलिस माझ्या जीवनीं
मी जगतों आहें तेथुनी ! २

" गे नसती धागे नूतन
हें जननान्तरिंचें बंधन !
या जालीं दोघे गवसलों,
या जालीं दोघे अडकलों ! ३

" कां धागा धागा उकलशी ?
कां भरभर ऐसें ओढशी !
नच तुटतिल धागे तोडुन !
—हें जननान्तरिंचें बंधन ! "

## १६

: : जाति–वंशमणि

जीवनदेवी ! जीवनिं येशी जेव्हां,
भग्न जाहलें होतें जीवन तेव्हां !
जीवन माझें—निर्दय खेळ नियतिचा— !
चोळामोळा झाला कधिंचा त्याचा !
नियतीपुढतीं नच उपाय मनुजास !
—व्हायचा तसा होउं दिला मीं नाश !

ओसाडींतिल पडकें मंदिर जीर्ण—
त्यापरि माझें जीवन पूर्ण विशीर्ण :
पडझड येथें पडझड तेथें होई,
दगड–विटांच्या राशी ठायीं ठायीं;
उगवे पिंपळ कोसळलेल्या शिखरीं,
घुमति पारवे दिवसभरी एकसरीं;
ठावठिकाणा मूर्तीचा नच जेथें,
गुरव केविं ये पूजनास मग तेथें ?
दिवा निशीथीं नच दिसला कवणाला,
कोल्हेकुइ ये परंतु ऐकायाला !

—देवी ! येशी अशा जीवनीं मम तूं !
काय नियतिचा वक्रच यांतहि हेतू ?

येतिस आधीं तर येता मज धीर :
दिधला असता लढा नियतिशीं घोर ! २०
शक्त न होतों जिंकाया नियतीतें,
विक्रमिं मिळता विजयच्च अजयीं मातें !

१७ : : वृत्त—पृथ्वी

कुणी भजक मंदिरीं निशिदिनीं रमे पूजनीं
परंतु नुपजे दया किमपि देवतेच्या मनीं !
प्रसन्न लव होइ ना, वर कुठूनि देई तरी ?
—हताश भजकाचिया विफलता जडे अंतरीं ! १

तिथें पडुनि राहिला शिर तिच्या पदीं टेकुनी
स्वतांस विसरे तसा विसरला जगालागुनी !
तयास मग भास हो : प्रगट होउनी देवता
कठोर वदते तया वचन हांसतां हांसतां : २

" कधीं विफलतेमुळें मम विनाश तूं वांछिशी ?
घणास कधिं हाणुनी मजसि भंगुनी टाकिशी ? "
—हलाहलच्च ओतुनी हंसत गुप्त हो सत्वरी
सवें भजक येतसे खडबडूनि भानावरी ! ३

स्मरूनि वच देविचें खळखळूनि आलें रडें
म्हणे, " हृदयहीन हा तुज विनोद कां आवडे ?
प्रसन्न जरि होशि ना, तरि घणास मी घे कसा ?
तुझा भजक हा तुला अधम वाटला कां असा ? ४

" विकल्प मनिंचा तुझ्या वितळल्याविना येथुनी
तुझे चरण देवते ! कधि न जायचा सोडुनी ! "
—पुन्हां पडुनि राहिला शिर तिच्या पदीं टेकुनी
जगास विसरे तसा विसरला स्वतांलागुनी ! ५

## १८ : : जाति—लीलारती

सौंदर्यदेवता स्वप्नीं मम येउन
बोल्ली, " ऐक रे ऐक कान देउन :
सौंदर्य, म्हणति जन, दुःखद गमतें तुला—
वाटलें नवल किति मज अवघें जाणुन ! १

" सखि जीवनिं नव्हती आलेली जेधवां
सौंदर्य सुखद तुज गमलें ना तेधवां ?
कां पालट व्हावा सखिच्या भेटीमुळें—
कधि विचार याचा केला कां रे तुवां ? २

" आनंद व्हावया सौंदर्यापासुन
पाहिजे जावया अभिलाषा लोपुन :
सौंदर्यधर्मिचा अनासक्ति—योग हा !
कां योगाचें त्या नच करिशी साधन ? ३

" अभिलाषा धरिशी सखिची निज अंतरीं
ती सफल जाहली नाहीं अजुनी तरी !
सौंदर्य सखीचें दुःखद म्हणुनी गमे,
सौंदर्यदृष्टिही डहुळुन गेली पुरी ! ४

4630

" –सौंदर्य दुःख दे केविं निसर्गांतलें ?–
—सौंदर्य कलेंतिल कधिं दुःखद जाहलें ?–
परि सौंदर्यें हीं दुःखच देती तुला !
नच नवल सखीचें सौंदर्यहि बोचलें ! ५

" सौंदर्य सखीचें सुखद खचित होइल
अभिलाषा त्याची जरि विलया जाइल.
बघ तटस्थापरी सखि–सौंदर्याकडे
तें क्षणांत तुझिया चित्ताला सुखविल ! ६

" सखि–सौंदर्यातें बघशिल जरि यापरी
सौंदर्यदृष्टि तव निवळुन जाइल तरी :
नच सखिचें केवळ, परि सौंदर्यहि दुजें
हृदिं आनंदाची वाजवील बांसरी ! ७

" अभिलाषा त्यजुनी सौंदर्या पाहतां
आनंद त्यांतला ये अवघा सेवितां;
सौंदर्य कुणाहि न दुःखद मग होइल !
–हें सांगायाला स्वप्नीं आलें स्वतां ! " ८

१९ : : छंद—'साद'

प्रीति वसते मनांत मनांत
न ये दावितां जनांत जनांत ! १
नाम गे तुझें मुखांत मुखांत
कसें वदूं तें लोकांत लोकांत ? २
जातों एकला रानांत रानांत
न ये कोणाऱ्या ध्यानांत ध्यानांत ! ३

साद घालतों प्रेमांत प्रेमांत
गोडी सुधेची नामांत नामांत ! ४
नाम घुमतें वनांत वनांत
हर्ष मावेना मनांत मनांत ! ५

२०

: : छंद—चंद्रकांत

असें कसें ग्रीष्मांतलें ऊन तापलें ?
असे कसे नदी—नाले आटून गेले ?
अशी कशी रखरख झाली अवनी ?
अशा कशा झळा येती चहूंकडूनी ?
असे कसे दिसतात तरू वाळले ?
असें कसें पान पान गळून गेलें ?
अशी कशी पुन्हां फुटे तयां पालवी ?
अशी कशी पुनरपी ये टवटवी ?
असा कसा रस घेती जमिनींतून ?
असें कसें जगतां ये तयां जीवन ? १

असा कसा जीवा ! तुझा धीर सुटला ?
असा कसा जीवनींचा रस आटला ?
असे कसे दूरतेनें प्राण सुकले ?
असें कसें प्रेम म्हणूं तुझें दुबळें ?
असा कसा तरूंहून तूं क्षुद्र होशी ?
असा कसा प्रीतींतून रस न घेशी ?
असें कसें पुरें नसे प्रेम हृदींचें ?
असें कसें वेड चिर सहवासाचें ?
अशी कशी पुरते न जगाया प्रीति ?
अशी कशी दूरतेनें भंगली शांति ? २

नों. नं. ........

२१ : : छंद—पूजिका

पश्चिमेकडून वारा वाहे भणभण
अधीर मनानें विचारतों त्यालागून :
" सांग रे पवना ! तुझ्यांत कां मिसळला
निःश्वास एखादा मजसाठीं टाकलेला—
माझिया सखीनें
माझ्या स्मरणानें ? " १

पश्चिमेकडून पावसाच्या सरी येती
आतुर मनानें विचारतों तयांप्रती :
" सांगा गे सरींनो ! तुमच्यांत कां मिळाला
अश्रु एक तरी मजसाठीं गाळलेला—
माझिया सखीनें
माझ्या स्मरणानें ? " २

२२ : : जाति—लीलारती

तव आठवणीनें नीज न ये लोचनीं
तळमळत कंठिली शेजेवरि यामिनी ! १
लागली वहाया शीतल खारी हवा,
पसरला चहुंकडे पहाटचा गारवा ! २
शय्येस सोडुनी आलों मी अंगणीं
पूर्वेला दिसली शुक्राची चांदणी ! ३
तें स्निग्ध, मनोहर तेज तिचें पाहुन
आठवले सखये ! तव लाडिक लोचन ! ४
जो दिला दिलासा स्नेहमयी दृष्टिनें,
दे तोच नील तें शुक्राचें चांदणें ! ५

२३ : : जाति—मृगपंक्ति

आजच पहिल्यानें चंद्राची शोभा नयनीं भरली,
आजच पहिल्यानें ताऱ्यांची आभा चित्तीं ठसली ! १
आजच पहिल्यानें अंगणिंचा चांफा मनिं दरवळला,
आजच पहिल्यानें बुलबुलही हृदयांतिल कुजबुजला ! २
आजच पहिल्यानें आनंदें विश्व कोंदलें दिसलें,
आजच पहिल्यानें मज गमलें जीवित सुफलित झालें ! ३
आजच पहिल्यानें प्रीतीची सुधामाधुरी कळली,
—आजच पहिल्यानें प्रीतीची अनुभूती मज आली ! ४

२४ : : छंद—गजवदन

निसर्ग-सौंदर्य आवडतें सारें,
आवडती त्यांत आकाशींचे तारे.
तेज तारकांचें केवळ अद्‌भुत
दिव्यत्वाची साक्ष पटते तयांत !
तेज तें पाहतां उजळे अंतर,
तिमिर आंतला पळे दूर दूर ! १

कलांचें सौंदर्य आवडतें सारें,
संगीत त्यांतही वेडें करी पुरें !
ऐकतां तें कानीं हरपतें भान
तुटे तटतटा आत्म्याचें बंधन !
विमुक्त तो आत्मा आनंदनिर्भर
यक्षभूमीमधें करितो विहार ! २

मानव–सौंदर्य आवडतें सारें,
परंतु लावण्य गडे तुझें न्यारें !
तयाच्या दर्शनें मजला साचार
चिर सौंदर्याचा घडे साक्षात्कार !
अनंत जन्मींची पुरलीसे आस
पूर्णता अखेर आली जीवनास ! ३

२५ : : छंद—निर्झरगीत ( त्रिपदी )

धगधगती दिव्याची ज्योत धरितां हातीं १
हात जळेल पोळेल जीव हळहळेल; २
वेलीचें फूल सुगंधशाली मृदुमृदुल ३
घेतां हातांत क्षणीं दो क्षणीं मळ्ल होत; ४
दिव्यता एक स्पर्शें अन्यास करिते खाक ५
दुजी दिव्यता स्पर्शमात्रेंच सुकते स्वतां ! ६
सखये ! परी तुझी दिव्यता न्यारीच सारी ! ७
ती नच दाही, तशीच स्पर्शें नच सुकेही ! ८
वाटे तियेंत चंद्रकरांचें भरे अमृत ! ९
स्पर्शितां तुला तेंच अमृत लाभलें मला ! १०
कणाकणांत संजीवनाचा संचार होत ! ११
आतां जीवनीं नवीन आशा तुझ्यापासोनी ! १२

२६ : : जाति—भूपति

ही लावण्यानें मन मोहुन नेणारी,
ही बुद्धिबलानें वश मजला करणारी,

ही भावभावना मम जाणुन घेणारी,
ही हृत्सुम साधें उचलुन उरिं धरणारी ! १

ही विरहामाजी धीर सदा देणारी,
ही हांक मारितां द्रुत धांवुन येणारी,
ही भेटिंत मजवर सुधासेक करणारी,
ही मृतकल्प मना संजीवन देणारी ! २

ही चुकतां कांहीं मज रागें भरणारी,
ही स्वतांस रक्षुन मम रक्षण करणारी,
ही जीवनतारा—तमिं पथ दाखविणारी,
ही जीवननौका—पैलपार नेणारी ! ३

२७ : : जाति—लवंगलता

कशाला रडगाणें रे असलें ? ध्रु०
न हें जहालें, न तें जहालें—कुरकुरणें तरि कसलें ? १
न व्हायचें तें घडे : गवसलें प्रेय तुझें मुकलेलें ! २
" नच चिर मीलन—नच सहजीवन !—" ध्रुवपद तरिहि न सरलें ! ३
निष्प्रेमाहुन नसे थोडकें झालेलें हें सगळें ! ४
तेंहि न घडतें तरि तव आयू व्यर्थच होतें गेलें ! ५
घे मिळतो तो रस जीवनिंचा—कुणी पाहिलें पुढलें ? ६

## पतिता : : छंद—परिलीना

कुणा नगरींत पतिता नारी
पापपंकामधें रातली पुरी !
नगरजनांस कळलें सारें,
फुलले क्रोधाचे हृदीं निखारे ! १

वरावरी तिच्या घालिती घाला
कोलाहल तेथें एकच झाला !
सामानसुमान मोडतोडिती,
पेटवून देती घरच अंतीं ! २

मुसक्या बांधून नगरांतून
मिरविती तिज ते विटंबून !
पाषाणवृष्टीनें कराया ठार
गांवाऱ्या बाहेर नेती अखेर ! ३

झाडाशीं बांधिलें करकचून
जाहली बापडी अधोवदन !
अश्रु ओघळती नयनांतून
पश्चात्तापें शुद्ध जाहलें मन ! ४

परी जनांस ये कुठून दया ?
सज्ज झाले तिज ठार कराया !
तोंच अवचित ख्रिस्त पातला
तेजें त्याच्या जो तो दिपून गेला ! ५

पतितेजवळी जाऊन ठेला
हात शिरावरी तिच्या ठेविला !

बाहू उभारुनी जनांलागोनी
बोलला यापरी गंभीर वाणी : ६

" पापाचा वाराही न जया ठावा
तेणेंच पाषाण हिला मारावा ! "
—अवघे ठायींच विरुन जाती
एकसरें माना गेल्या खालतीं ! ७

हातींचे पाषाण देती फेंकून
खिस्ताच्या चरणीं जाहले लीन !
पतिता सन्मानें विमुक्त केली,
वाजत-गाजत नगरीं नेली ! ८

## गडावरील पुनव

: : छंद-' पुनव '

मंडूगड माळव्यांत सकळिकां अवगत
पहाया ये एक मुशाफिर
रमे मन नुरे भान मावळून गेला दिन
रातभर राही गडावर.
पुनवेचा निशानाथ उगवला गगनांत
गड न्हाला शुद्ध कौमुदींत
भयानक शांततेंत भयानक एकांतांत
झोंप कैंची मुशाफिरा येत ? १

जाहलीसे मध्यरात गडावर उठतात
परोपरी भीषण आवाज :
कधीं पाय वाजतात, कधीं हय हिंसतात,
कधीं कधीं होई कुजबुज !

संगीताचे गोड सूर कधीं येती कानांवर,
हत्यारांची कधीं खणाखणी;
भयभीत मुशाफिर स्वेदकण भाळावर
धडधड हो अंतःकरणीं ! २

अवचित एक नार प्रगटली मनोहर
—थरथर कांपे मुशाफिर !
तयालागीं द्याया धीर हात तिनें केला वर
त्यामधून दिसे आरपार !
—पक्षी भयें धरत्यांत किलबिल करितात,
पारवेही घुमटीं घुमत—
चार–दोन तयांतले उडूनिया नभीं गेले
पंख सान फडफडवीत ! ३

वदे नार, " मुशाफिरा ! भिऊं नको, ऐक जरा :
गडाची मी रूपमती राणी
अवसेला–पुनवेला भेट देतें मी गडाला
लवाजमा सांगातीं घेऊनी.
कन्यका मी ठाकुराची गोडी मज संगीताची
मालवेश बाज बहादूर—
फिदा होई मजवरी मीही तया अंगीकारी
—प्रीतीचें हो मधुर मीलन ! ४

" स्वयं बाज बहादूर संगीतांत मशहूर
अनुगुण मी तयाची राणी :
दिनरात संगीतांत उभयतां झालों रत
—कर्तव्यातें गेलों विसरूनी !

संगीताच्या समाधींत एका दिव्य अवस्थेंत
शोधियला मीं भूपकल्याण :
मुद्दें बाज बहादूर गानोत्सव करी थोर
—नगरीं न ध्वनी गाण्यावीण ! ५

" गानोत्सवीं सारे गुंग तोंच घोर ये प्रसंग
—घाला घाली अकबर-सेना
कर्तव्यातें उपेक्षिलें कटु फल तया आलें
—रणांगणीं उडे पुरी दैना !
पळे बाज बहादूर मजपुढें अंधकार !
—खुपसून मी घेई खंजीर !
आत्मघात केल्यामुळें भूतयोनी मज मिळे
—तींतून मी कधीं सुटणार ? — ६

" मुशाफिरा ! ही कहाणी सांग जनीं तूं जाऊनी
कर्तव्याचा दे तयां संदेश ! "
—बोलूनिया येणेंपरी वस्त्र थोडें दूर सारी
उरांतल्या दावी जखमेस;
वाहे रक्त तिच्यांतून बोट त्यांत बुडवून
मुशाफिरा लावी टिळा भाळीं
काल्यापरी स्पर्श गार झाडण्या दे मुशाफिर !
—नार झणीं अदृश्य जाहली !

* * *

पुन्हां पक्षी घरट्यांत किलबिल करितात,
पारवेही घुमटीं घुमत—
चार-दोन तयांतले उडूनिया नभीं गेले
पंख सान फडफडवीत ! ७

## तरलेले वेद

: : छंद—गजवदन

रामेश्वर वदे तुकयालागून :
“ अभंगाच्या वह्या दे जळीं टाकून !
वाणींत तुझिया श्रुती उमटते,
अधिकार न हा तुजला शूद्रातें ! ”
—तुकयावरतीं कोसळे गगन
शून्य तया वाटे अवघें जीवन !
भक्ति आणि काव्य त्याचीं जीवनांगें :
एक अंग आतां पांगूळाया लागे !
पांगूळतां काव्य भक्ति पांगूळते—
उभयीं यापरी एकपण होतें !
कोठली मग त्या जीवनाशा उरे ?
—पायातळीं सारे जळते निखारे ! १

परंतु दुसरा उपाय न कांहीं
द्विजाचा आदेश पाळी लवलाही :
अभंगाच्या वह्या बांधिल्या पालवीं
इंद्रायणीकडे पावलें वळवी.
जिजाई वदली तया अडवून :
“ नका जळीं घालूं कवितेलागून !
तिजसाठीं जन्म दवडिला वाया,
कसा वाहे हात तिज बुडवाया ? ”
—शून्य दृष्टीनें तो बघे तिजकडे
निःश्वास सोडून जाऊं लागे पुढें.
कर्दळीपरिस जिजा पडे खालीं,
आंसवांनीं तिच्या धरणी भिजली ! २

टाकिलें दप्तर अथांग जळांत
बुडबुडे वरी चार-दोन येत !
विकल हो देह, विकल हो मन,
एका शिळेवरी राहिला पडून !
गांवभरी क्षणीं मात कळे जनां,
तुकयाची जो तो करितो हेळणा :
एक वदे, " मागें खतें बुडविलीं
आतां कवितेची तीच गत केली ! "
दुजा वदे, " बुडे इह-पर-लोक
नकळे याजला काय झालें सुख ! "
—एकेक यापरी निंदाया लागती,
कुणी कुणी तया खडेही मारिती ! ३

तुकयाच्या हृदीं एकच विचार :
मिळावें परत कोरडें दप्तर !
विचारावरी या चित्त हो केंद्रित
दुसरें कांहींही न तया सुचत !
हरपली झोंप, हरपली भूक,
हृदयीं एकच उठतसे हांक !
एक-दोन-छे, छे ! झाले तेरा दिन
हालला न लव तो शिळेवरून !
मात्र मुखांतून विठ्ठल-नामाचा
अस्फुट गजर होतसे सदाचा
हीच कां म्हणावी समाधि योग्याची ?
हीच का गणावी अवस्था सिद्धाची ? ४

कोरडें दप्तर मिळावें परत—
क्षणोक्षणीं तीव्र विचार हा होत.

तुकया आधींच    शुद्धान्तःकरण,
भावनेला आलें    उमाप उधाण;
उत्कट झालेल्या    त्याच्या विचारांत
अत्यद्भुत शक्ति    जाहली उदित !
विचार शक्तीचें    असे मूलस्थान
त्यापुढें विफल    वज्र, सुदर्शन !
विचाराची शक्ति    हृदीं प्रगटतां
निसर्ग हो वश    पाहतां पाहतां !
हीच शक्ति रक्षी    तुकयालागून
अन्नपाण्यावीण    पूर्ण तेरा दिन ! ५

तेराव्या दिवशीं    उत्तर रात्रीस
तुकयास झाला    एक दिव्य भास :
दिसला तयास    अफाट सागर
त्यांत बुडवितो    वेद शंखासुर
—त्रिभुवनामधें    झाला हाहाःकार
महाविष्णूलागीं    आळविती सुर—
—कनवाळू प्रभु    धांवला धांवणें
मत्स्यरूप घेई    भक्तांच्या कारणें—
—बुडी घे तळाशीं    काढी वेद वरी
चक्र फेंकूनिया    शंखासुरा मारी !
—उठे आनंदाची    एकच आरोळी
नाद तो भेदून    गेला अंतराळीं ! ६

तोंच तुकयानें    डोळे उघडिले,
पाहिलें भंवतीं    लोक जमलेले
करीत ते होते    जयजयकार
—होता घडलेला    थोर चमत्कार ! :

चवदाव्या दिनीं फुटतां पहाट
अभंगाच्या वह्या जळीं तरंगत !
विचारामधली शक्ति अत्यद्भुत
तुकयाचें अंतीं पुरवी ईप्सित !
गांवकरी वह्या बाहेर काढिती,
पालखीमधून मिरवीत नेती !
" विठ्ठल–विठ्ठल !—" चालतें भजन
तुकयाचें मन पावे समाधान ! ७

## क्षमा

: : छंद—लवंगलता

मक्केवरी रजनीनें पंख पसरले,
शिशिराचें एकछत्र अधिराज्य चाले.
वाळवंटावरून ये हिमशीत हवा
—शिशिराचा निःश्वासच काय हा म्हणावा ? १

मक्केमधें नीरवता राहिली भरून
भंग मात्र तिचा होई भुंकतांच श्वान !
पुरवासी निद्रेचिया जाहले आधीन
—चाहूल न संकटाची तयांस अजून ! २

नगरीच्या वायव्येस प्रकाश कसला
दिसतसे पांडुरका उडून धुरोळा ?
कसला हा जयध्वनी येतसे श्रवणीं ?
—परचक्र मक्केवरी काय ये चालूनी ? ३

नगरीच्या जवळ ये प्रकाश दौडत—
दिसतात पाजळले चुडे असंख्यात !
ऐकूं येई स्पष्ट घोष : ‘ अल्ला हो अक्बर ! ’
दऱ्याखोऱ्या करितात त्याचा अनुकार ! ४

घोड्यांवरी कुणी स्वार, कुणी उंटांवरी,
लखलख करांमधें भाले—तरवारी;
आघाडीस अश्वावर आरूढ हा कोण ?
—वृद्ध तरी मांड त्याची लवही चळे न ! ५

अर्ध शुभ्र, अर्ध कृष्ण मुखरोमावली,
लोचनांत धगधग आगच पेटली !
साधा साफा शिरीं, साधें कुडतें अंगांत ,
नग्न खड्ग सरसावी सारखें हातांत ! ६

अरे, हाच महंमद इस्लामी प्रेषित
मक्केवरी चाल करी निशीं अवचित !
उसळती हृदीं त्याच्या जुन्या आठवणी
—सुख आणि दुःख यांची ती पाठशिवणी ! ७

“ मक्केमधें मी जन्मलों, मक्केंत वाढलों,
मक्केंतलें दाणापाणी सेवूनिया धालों;
मक्केमधें ‘ खदिजा ’ ये माझिया जीवनीं
—वाळवंटीं हिरवळ आली बहरूनी ! ८

“ मक्केचिया परिसरीं ‘ हिरा ’ पर्वतांत
गुहेमधें मजलागीं साक्षात्कार होत;
मक्केंतच इस्लामाची पाजळली ज्योत
—दिव्य प्रभा तिची फांके अमित चित्तांत ! ९

" मक्केतील कुरेशांस तें रुचे कुठून !
छळियलें परोपरी मज रात्रंदिन !
प्राणभयें मदिनेस केली हिजरत,
तरी त्यांच्या वैराग्नींत मी नित्य जळत ! १०

" सूड कां न उगवूं मी कुरेशांवरतीं !
मक्का सर केल्यावांण कैंची मना शांती ! "
—यापरिस महंमद बोलला स्वगत
' दोन वाणी ' हृदीं त्याच्या जाहल्या उदित ! ११

" सूड ! सूड ! "—एक वाणी वदली गर्जून—
" कुरेशांस पुरतेंच टाक निर्दाळून !
आठव तीं घोर रणें, तीं क्रूर कंदनें,
—सांग आतां काय तरी उरे सूडाविणें ? " १२

दुजी वाणी मंजुरवें व दे, " ऐक, ऐक !
कुरेशांस क्षमा करी धरून विवेक !
समर्थ तूं आज त्यांचा कराया निःपात,
म्हणूनच क्षमा तुवां करणें उचित ! " १३

घडीभर महंमद झाला विचलित,
तोंच सेना मक्केचिया वेशींत शिरत.
वेढा पडे नगरीस सेनेचा क्षणांत
मक्कावासी जनांत हो एकच आकांत ! १४

निद्रित ते जागे होती, जागे ते पळती,
रस्त्यांतच पडूनिया करुणा भाकिती !
आया-बाया, मुलें-बाळें लपतीं घरांत,
कुणी कुणी दडी घेती काबा मंदिरांत. १५

कुरेशांचा वीर नेता अबू सुफियान
अवचित आलेलें हें संकट जाणून
महंमदापुढें जाई—चिंता हृदयांत—
—रुमालांत बद्ध हात—आंसवें डोळ्यांत ! १६

म्हणे, " नको रक्तपात करूं अकारण,
कुरेशांचीं कुळें तुज अवघीं शरण !
जे जे गुन्हे केले त्यांनीं, समज माझे ते !
मारायचें असे त्यांतें तरी मारी मातें ! " १७

पुनरपी दुजी वाणी कूजिते मधुर :
" सोड किंतू, क्षमेचाच करी अंगीकार !
प्रेषित तूं—थोर तुझा लोकीं अधिकार
उपकार करूनिया फेडी अपकार ! " १८

महंमदा गहिंवर आला अनावर,
नभाकडे पाहूनिया वदला गंभीर :
" प्रभो ! तुझ्या कृपेलागीं नच अंतपार,
आणिलेंस लेंकरास तुवां मार्गावर ! " १९

वारंवार अबूस दे प्रेमें आलिंगन,
म्हणे, " जा, मीं क्षमा केली कुरेशांलागून ! "
हर्षभरें महंमद–हस्तास चुंबून
सकाळिकां कळवाया जाई सुफियान. २०

नगरीचा नूर क्षणीं गेला पालटून :
आनंदास आली वेगें भरती तुफान !
शेष रात्रीं रोषणाई हो नगरभर,
तार स्वरें घोष चाले ' अल्ला हो अक्बर ! ' २१

दुज्या दिनीं पहाटेस काबा मंदिरांत
मक्कावासी जन झाले जमा शत शत;
इस्लामाचा सकलांनीं स्वीकार करून
जीर्ण मूर्ती निज हातीं टाकिल्या भंगून !

## अमृतकुंभ : : मुक्तछंद

अशीच कुठें कुणाकडून
ऐकिली एक दंतकथा मीं;
—सांगतों तीच रसिकजनां कवनीं:

* * *

कुणा गांवाच्या जवळ होतें
गहन वन भयदायक :
—रविकरही त्यांत शिराया माघार घेती !—
अवशीं आणि पुनवीं
मध्यरात्रीचा समय होतां
वनांतून त्या साद उठते :
" नरनारींनो ! सानथोरांनो !
या, या अवघे या रे या—
अमर व्हाया कुंभ सुधेचे घेऊन जा रे ! "
—साद येतांच ही कानांवर
वेडावतात भावतरल युवयुवती !
मोहपाशांतें तटतटां तीं तोडून
धांव घेतीं त्या घोर काननीं !
जातांच तेथें काय तयांतें दिसतें ?

—ववतीं कुंभ एकसारखे अनंत !
होते ते सारे कशानें तरी भरले.
—परी त्यांतले अमृतकुंभ कोणते ? —
—ओळखावे ते कवणेपरी ? —
नेणून मग युवयुवती
हातीं आलेले कुंभ न्यावया पाहतीं.
—तोंच त्यांतील विषद्रव्याचा वाफारा
लागोनिया तीं प्राण तात्काळ सोडितीं !
कुंभ सुधेचे होते थोडके,
विषकुंभच त्यांहून होते अधिक !
—परंतु कैसें एकाएकीं हें तयां कळावें ? –
अजाणपणें तेथें गेलेलीं युवयुवती
अमर व्हाया जाऊन होतीं मृतच अंतीं !
—यापरी घाली कराल काल थैमान
अवसेचिया, पुनवेचिया निशीथीं !
पहाट होतां कुंभ अवघे होतात गुप्त,
आणि उरतीं प्रेतें मात्र तीं !

* * *

गांवकऱ्यांना कथिलें कुणी :
चेटकीण वा दानवी एक
मानवांचिया जीवांशीं खेळे खेळ निर्घृण !
म्हणून तिचा शोध कराया,
आणि तिजला ठार माराया
पुनवीं एका गांवकरी ते निघाले.
आकाशीं होता झळझळत चंद्रमा,
–गत दिनाची कवटीच त्यां वाटे ती !—
आणि चांदण्या गमल्या तयां

निशा-रूपिणी चेटकिणीनें
अभिमंत्रून उधळलेल्या अक्षता !
घेतल्या होत्या गांवकऱ्यांनीं मशाली-
-ज्यांतून होते जळते थेंब गळत
तप्त सोन्याच्या रसासारखे !-
तैसेच त्यांनीं होते घेतले
लखलखते भाले आणिक खड्गही !
वनामधून घुमत होती साद सारखी,
अनुरोधानें तिच्या ते तेथें पातले.
कुंभ अमुप होते त्या स्थलीं दिसत-
पाहतांच ते गांवकऱ्यांना ये चेव !
गर्जू लागले, " काय बघतां ? व्हा पुढें !
क्षणीं कुंभाच्या करूं ठिकऱ्या-ठिकऱ्या !
आणि काढू त्या दानवीलागीं शोधून,
करूं तियेचीं शस्त्रें खांडोळीं-खांडोळीं !
—होवो आपुली काय व्हायची ती गत !— "
—ऐसें वदून कुंभ फोडाया
गांवकरी ते सरसावले त्वेषानें !
—परंतु काय चमत्कार ये घडून !—
क्षणाभीतरीं कुंभच होती ते अंतर्हित !
आणि हास्याचा ध्वनी विकट उठला,
घनगंभीर रवें अदृश्य कुणीसें बोले :
" खुळ्यांनो ! बोल लावितां मला कशाला ?
—दानवी न मी, तेंवीच न रे चेटकीणही !
' निसर्गदेवी ' मज म्हणती
कुंभामधल्या विषें मरतीं युवयुवती,
परी हा कैसा माझाच दोष गणावा ?

—ठेविलें न कां अमृतही मीं कितेक कुंभीं?—
तुम्हां वाटतें त्यापरी नाहीं दुष्ट मी,
आणि सुष्टही न वदा मला !
दुष्टता आणि सुष्टता यांच्या अतीत रे मी !
—विषापरिस सुधाही विश्वीं मी ठेवीं !
प्रज्ञा आपुली चालवून ती ओळखा,
आणि सेवून अमरपद मिळवा ! ”

* * *

कितेक कुंभीं खरेंच होतें अमृत—
याची प्रतीति गांवकऱ्यांना दावाया
निसर्गदेवी करी करणी अद्‌भुत :
हातच दोन दिसूं लागले तियेचे,
होता तयांनीं धरिला एक अमृतकुंभ;
जवळ होता तरु वाळला-वठला,
त्यावरी दिला कुंभ ओतून तिच्या हातांनीं !
—कोण नवल !—निमिषमात्रीं तो तरु
पानाफुलांनीं बहरूनिया डोलूं लागला !
विस्मित होत गांवकरी ते सकल
आले तसेच गेले परत !

## आदिनारी— एकांकी नाट्यकाव्य : : छंद—हरिभगिनी

पात्रें:—

'आदिनारी' नाटकांतील पात्रें :

| | |
|---|---|
| विवस्वत् | गंधर्व व यमीचा पिता |
| सरण्यू | अप्सरा व यमीची माता |

अप्सरा

प्रेक्षकांतील पात्रें :

| | |
|---|---|
| वरुण | द्युलोकाचा राजा |
| इंद्र | वरुणाचा सेनानी |

दोन गंधर्व व इतर प्रेक्षक

स्थळ:—

'आदिनारी' नाटकांतील प्रसंग पृथ्वीवर घडतो. त्याचा रंगभूमीवरील प्रयोग द्युलोकांत देवांच्या नाटकगृहांत होतो.

[ द्युलोकांतील नाटकगृह. 'आदिनारी' या एकांकी नाटकाचा प्रयोग व्हावयाचा आहे. प्रयोगाची वेळ होत आली आहे. प्रेक्षकांची वर्दळ सुरू आहे. देव–देवांगना व गंधर्व–अप्सरा जोडीजोडीनें येत आहेत. प्रमुख ठिकाणीं वरुण व इंद्र यांचीं रत्नजडित आसनें मांडलीं आहेत. इतरांसाठीं हि योग्यतेप्रमाणें आसनें ठेवलीं आहेत. प्रेक्षकवर्ग आसनांवर विराजमान होत आहे. गंधर्व व अप्सरा यांच्यांत नाटक व त्याचा अपेक्षित परिणाम यांबद्दल कुतूहल वास करीत आहे.

प्रेक्षकांतील दोन गंधर्व–मित्र आपापसांत बोलत आहेत. ]

**पहिला गंधर्व** : काय हेतु धरून हो आजचें हें नाटक ?
**दुसरा गंधर्व** : कांहींच कां नाहीं तुला त्यामधलें ठाऊक ?
**पहिला गंधर्व** : नव्हतों मी येथें, नच कानीं कांहीं माझिया.

दुसरा गंधर्व : सांगतों मी. ये जवळ. नको कुणी ऐकाया :
विवस्वतें कांतेसह केलें आहे गमन
भूलोकातें—जेथें सुत यम पावे निधन.
सुता यमी निज दुःख विसरून जावया,
विवस्वता हवी रात्र धरातलीं व्हावया.
गमे त्यातें : वरुणास वळवितां येईल,
निर्मावया रात्र तेथें तो तयार होईल.
परंतु त्या भय वाटे: इंद्र आड येईल,
निर्मानवी धरा व्हावी—हेंच तया रुचेल !
जरी असे 'देवराज,' 'द्युलोकश' वरुण,
वृद्धत्वें तो 'युद्धदेव' इंद्राचिया आधीन !
इंद्रालागीं चढवावें चौघांमधें गांठून,
घ्यावें तया कसेंबसें अनुकूल करून—
या हेतूनें विवस्वतें कळविल्यावरून
अप्सरांनीं बसविलें हें नाटक नवीन.
पाहूं काय घडे—

पहिला गंधर्व : —डाव सुरेखच टाकला !—

दुसरा गंधर्व : पहा, पहा, वरुण ये, इंद्र तोही पातला.
आणि घंटा घणघण प्रयोगाची वाजते,
चल, चल, पटकावूं त्या रिकाम्या जागेतें !

( वरुण व इंद्र नाटकगृहांत प्रवेश करून आपापल्या आसनांकडे जातात. सर्व प्रेक्षक उठून त्यांना उत्थापन देतात. प्रयोगाची घंटा वाजते. हे दोन गंधर्वहि दोन रिकामीं आसनें पटकावितात. )

•

[ रंगभूमीचा भरजरी पडदा वर जातो. 'आदिनारी' नाटक सुरू होतें. नाटकांतील विवस्वत् व सरण्यू हीं पात्रें गंभीर व चिंतातुर मुद्रेनें बोलत असतात. त्यांचीं कामें—विवस्वताचें कामहि—दोन अप्सरांनींच केलेलीं

आहेत. विवस्वत् व सरण्यू या सत्य स्वरूपांतील व्यक्ति सर्वपरिचित असल्यामुळें त्यांच्या या ' सोंगां 'कडे प्रेक्षक उत्कंठेनें पाहतात. ]

विवस्वत् : सरण्यू, हा एकमेव मज दिसे उपाय
यमीलागीं वांचवाया !

सरण्यू : — उपाय कीं अपाय !—

विवस्वत् : म्हण कांहीं !— परी टळे संकट हें आतांचें;
वांचतील आज तरी तेणें प्राण यमीचे !
भूलोकांत दिन असे, रात्र नसे अजून,
व्हावयास हवी तेथें रात्र आतां निर्माण:
दिन-निशा-संयोगानें 'काल' जन्मा येईल,
तोच दुःख मानवास विसराया लावील !
यमी व्हाया दुःखमुक्त हाच एक उपाय,
निर्मावया रात्र प्रार्थू वरुणास उभय
नातरी गे यमीसही खचित ये मरण
यम गेला त्या दुःखानें !

सरण्यू : ——तेंच भय दारुण !
परी काल जन्मा येतां मर्त्य होई मानव,
अमरता मग तया पारखीच सदैव !
कालयोगें यमी जरी कांहीं काळ वांचली,
अंतीं तिची तीच गत जी यमाची जाहली !
जुळयांतला यम मात्र होता मर्त्य नेमला,
विकल्पानें मृत्यु आहे यावयाचा यमीला.
अमर न व्हायची ती काल येतां उदया,
जरी तिचें सर्व दुःख तो नेईल विलया.
तुमच्या या योजनेनें टळे मृत्यु आजचा,
परी तेणें अटळच ठरताहे उद्यांचा !
काढा मार्ग असा—जेणें मृत्यु चुके सदाचा,
अमर हो यमी आणि भावी वंश तियेचा !

नों. नं. १२०८
२२१५५३

विवस्वत : ज्या दुःखानें मृत्यु पाहे यमीलागीं ग्रासाया,
त्या दुःखातें हवें तिनें विसरून जावया !
—परी कसा दुःखाचा न व्हावा तिज आठव ?
कालावीण विस्मृतीचा असंभव संभव !
यमीसाठीं थोडके कां यत्न केले आपण ?—
भूलोकास आलों आहों द्युलोकातें सोडून;
बोधामृत तूं आणि मीं वेळोवेळीं पाजिलें;
जगभर फिरवून तिजलागीं आणिलें :
दाखविले गिरि आणि दाखविले सागर;
—कशानेंही तिज न हो स्वदुःखाचा विसर !
द्युलोकींच्या नुकत्याच आणियल्या अप्सरा
संगीतानें यमीचिया रमवाया अंतरा.
—परी हाही शेवटला बाण वाटे बोथट !

( पडद्यांतून यमीची "आई, आई !" अशी हांक ऐकूं येते. )

ऐक, शब्द यमीचाच—

( इतक्यांत यमी पुढें व अप्सरा तिच्या मागें अशा धांवत धांवत रंगभूमीवर प्रवेश करतात. अप्सरांनीं नृत्याचा वेष धारण केला आहे. एका अप्सरेच्या हातीं तेवता दिवा असून इतर अप्सरांच्या हातीं मोरपिसांचे मोठमोठे पंखे आहेत. यमी एकदम सरण्यूच्या गळ्यांत पडते व तीहि तिला पोटाशीं धरून तिच्या केंसांवरून हात फिरविते. )

यमी : अप्सरा या लाघट
आई, आई, पहा कशा परोपरी छळिती !
सांग कांहीं तयां !

सरण्यू : बाळे, काय तुज म्हणती ?

यमी : दीपनृत्य पाहण्याचा आग्रह त्या करिती !
वीट आला !—

सरण्यू : छे, छे वत्से, उचितच सांगती !

ये, ये, तुझ्या तातासवें दोघीजणी आपण
दीपनृत्य पाहूं; चला, घुमूं द्या गे पैंजण.

( दिवा हातीं घेतलेली अप्सरा मध्यभागीं उभी राहते. पंखे हातीं घेतलेल्या अप्सरा दोन समान रांगा करून तिच्या दोन्ही बाजूला उभ्या राहतात. पंखे घेतलेल्या अप्सरा ' वारे ' असून दिवा घेतलेली अप्सरा ' दीप ' आहे. त्यांचें समुचित नर्तन, गायन व अभिनय हीं सुरू होतात. )

वारे ( पहिली रांग ):
जाति—प्रणयप्रभा

मालवितों अम्हि मालवितों !
दीपकळी ! तुज मालवितों !

वादळांतले आम्ही वारे,
धुंद दशदिशा क्षणिं करणारे !
—क्षणहि नच टिके कुणि सामोरें !

फुंकरितों क्षणिं लोपवितों,
दीपकळी ! तुज मालवितों !

वारे ( दुसरी रांग ):
जाति—प्रणयप्रभा

मालवितों अम्हि मालवितों,
दीपकळी ! तुज मालवितों !

प्रलयकाळचे अम्ही प्रभंजन,
विश्वाचें क्षणिं करूं विध्वंसन !
—भंजनामधें अम्हांस रंजन !

फुंकरितों क्षणिं लोपवितों,
दीपकळी ! तुज मालवितों !

दीप:
जाति–प्रणयप्रभा

पाजळितें मी पाजळितें,
ज्योती अपुली पाजळितें !

जा, वाऱ्यांनो, जा माघारें,
चिज्ज्योतीला नच भिववा रे !
काळें पुरतें केलें तिमिरें !

उजळवितें जग धवळवितें,
ज्योती अपुली पाजळितें !

( दीपनृत्य होत असतां यमी सारखी अस्वस्थ असते. अखेर भावावेग असह्य होऊन ती भ्रमिष्टासारखें बडबडते. )

यमी : पुरें, पुरें, थांबवा गे हें नर्तन–गायन !
तें देखून-परिसून-यमाचें हो स्मरण !
मंजु मंजु स्वरीं त्याचें उमटतें बोलणें,
लयबद्ध पदन्यासीं प्रगटतें चालणें !
कुठें गेला यम माझा जिवलग जिवींचा ?—
—जुळा भाऊ, त्याचपरी, प्रियतम प्रीतीचा ?—
दाखवा तो झणीं कुणी, तयाकडे न्या तरी,
त्यावांचून झालें आहें केधवांची बावरी !
सोड, आई, सोड मीच आणतें त्या शोधून,
रागावून मजवरी बसला तो दडून !

( यमी आवेगानें धांवत पडद्यांत निघून जाते. विवस्वत् कपाळावर हात मारून घेतो. सरण्यू पदरानें डोळे पुसते. सर्व अप्सरा ओशाळतात. लौकरच भानावर येऊन सरण्यू अप्सरांना आंत यमीकडे जाण्यास खुणेनें सांगते. त्या जातात. )

विवस्वत् : सरण्यू, तूं पाहिली ना काय दशा यमीची ?
कैंची आशा, सांग, तिच्या दुःखमुक्त होण्याची ?
झुरुनिया यापरिस पावेल ती निधन,
उदरींचा गर्भांकुर तोही जाई वठून !
निर्मानवी धरा पुन्हां व्हायचा हा प्रसंग !
—आणि तुझ्या–माझ्या दैवीं सुतेचाही वियोग !
अनर्थ हा टाळावया तोच मार्ग आंखावा,
येवो सुखें येई जरी मर्त्यपणा मानवा !
—अमरत्वीं काय असे परिसीमा सुखाची !—
—मर्त्यपणीं छायाही कां उमटे न तयाची !—
ये, ये, याचूं रात्रीसाठीं सुरेश्वरा वरुणा,
तयावीण मानवाची यावी कुणा करुणा ?
सरण्यू : नाथा, पटे आतां मला तुमची ती योजना,
क्षमा करा बोलल्याची–हीच पदीं याचना !
कालाभावीं यमी कशी विसरेल दुःखातें ?
" यमा–यमा ! "—आक्रंदत सोडील ती प्राणांतें !
होवो उद्यां तिचें कांहीं, करूं आज रक्षण,
वरुणाला प्रार्थू रात्र करावया निर्माण.
परंतु ये शंका एकः इंद्र काय करील ? –
—"नको रात्र निर्मावया !" वरुणा का कथील ?–
ऐकिलें मीं : मानवाचा इंद्र करी दुस्वास;
वाटे तया : प्रज्ञाबळें तो जिंकील सुरांस !
म्हणून त्या मानवाचा वंशच्छेद रुचेल
ऐसें गमे !
विवस्वत्: खुळे, तुझी शंका सर्व निर्मूल !
कुठें इंद्र, कुठें तुझा तुच्छतम मानव !
इंद्रापुढें तृणप्राय देव आणि दानव !

—कल्पतरु काय करी अबोलीचा मत्सर ? –
—कसा तुझ्या अंतरंगीं भलता ये विचार ? –
थोरच गे असायचें हृदयही थोरांचें !
मोजमाप नको लावूं तयां कुणा क्षुद्राचें !
सोड शंका–सोड भीती ! –

( इतक्यांत प्रेक्षकांत बसलेला इंद्र ताडकन् उठून रंगभूमीवर येतो. प्रेक्षकांत एकच गडबड उडते. रंगभूमीवरून इंद्र त्यांना स्तब्ध राहण्याची खूण करतो. लगेच प्रेक्षकांत पूर्ववत् शांतता पसरते. ‘ आदिनारी ’ नाटक इथेंच आकस्मिक रीतीनें संपतें. पुढील ‘ रात्र--गीत ’ हाच काय तो त्यांतील शिल्लक उरलेला भाग होय. एरवीं तरी संकल्पित ‘ आदिनारी ’ नाटक या ‘ रात्र--गीता ’ नेंच संपणार होतें. )

इंद्र : —चमत्कार साचार !—
‘ युद्धदेव ’ मी म्हणून भासे जनां कठोर !
मृदुभाव माझियाही हेलावती चित्तांत !
—निर्मावया रात्र मीही वरुणास याचित !
मानवाचा देव कुणी कसा हेवा करील ?
—तुष्ट मी, तो मर्त्यों जरी सोम मज पाजील !

( प्रेक्षकांत हंशा व टाळ्या यांचा संमिश्र आवाज होतो. नंतर लगेच वरुणहि आसनावरून उठून रंगभूमीकडे जाऊं लागतो. तेव्हां प्रेक्षकांच्या टाळ्यांना आणखी जोर चढतो. इंद्र रंगभूमीवर किंचित् पुढें येऊन वरुणाला हात देऊन वर घेतो. )

वरुण : नाटकाचा आतां गोड शेवट मी करितों :
रात्रीलागीं भूलोकातें याच क्षणीं प्रेरितों !
कालामुळें यमी दुःख विसरेल—जगेल–!
—व्यक्ति नच, परी वंश, अमरता पावेल !

( प्रेक्षकांतून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट होतो. गंधर्व व अप्सरा यांच्या समूहांतून “ वरुण राजाचा जयजयकार असो ! —” असा जयघोष होतो.

नाटकांत काम करणारें ‘ विवस्वत् ’ हें पात्र प्रेक्षकांस हातानें शांत राहण्याची खूण करून म्हणतें. )

‘ विवस्वत् ’ : अप्सरांचें ‘ रात्रगीत ’ सकलांनीं ऐकावें,
मग सुखें येथोनिया निर्गमन करावें.

( पडद्यांतून पूर्वींच्या नाच करणाऱ्या अप्सरा पुन्हां रंगभूमीवर येऊन गीत गातात. )

**अप्सरा :**

जाति—लवंगलता

रजनी ! वसुधेतें झणि जाई ! ध्रु०
तिथें अजवरी दिन राज्य करी राणी त्याची होई,
शिवाशिवीचा खेळ त्यासवें अविरत खेळत जाई !
पट तेजाचा गगनावरचा सर सर ओढुनि घेई
नक्षत्रांची अद्‌भुत दुनिया खुली करुनिया देई !
अलक तमोमय अपुले काळे मुक्त सोड तूं बाई,
शिणल्या जगता झांकुनि त्यांनीं अंगाई त्या गाई !
हळुवार करीं मानव—हृदिचें दुःख हरुनिया नेई,
अति दुःखांतहि जगायचा त्या मंत्र शिकवुनी देई !

( प्रेक्षकांत दीर्घकाल टाळ्यांचा गजर होतो. रंगभूमीचा भरजरी पडदा खालीं पडतो. वरुण व इंद्र पडद्याआडच राहतात. ‘ आदिनारी ’ नाटक अपुरें राहून येथेंच संपतें. )

●

( प्रेक्षकवर्ग गटागटानें नाटकगृहाबाहेर पडतो. सर्वांत शेवटीं जाणाऱ्या गंधर्व—अप्सरांच्या घोळक्यांतून पुढें दिलेले तुटक उद्‌गार बाहेर पडतात. हे उद्‌गार काढणाऱ्या आवाजांतून आरंभींच्या दोन गंधर्वांचे पूर्वपरिचित आवाजहि एकदोनदां उमटल्याचा भास होतो. )

नाटक न पूर्ण झालें !—

*　　　*　　　*

—हेतु तर साधला !—

*　　　*　　　*

अभिनय हो सुंदर !—

* * *

—नाच गोड जाहला !—

* * *

विवस्वताप्रमाणेंच सरण्यूचें कामही
हुबेहूब हो !

* * *

—उभय हवीं होतीं या ठायीं !—

* * *

दीपनृत्यीं सूचकता—जीवनाचा संदेश—!

* * *

नच कळे—नच वळे—दुःख-दग्ध यमीस !

* * *

म्हणूनच हवी होती रात्र व्हाया निर्माण,
विवस्वतें बिनचूक केलें होतें निदान !

* * *

निर्मावया रात्र इंद्र संमती दे अखेर !

* * *

सांपडला चौघांमधें, आणि स्तुति हो फार !

* * *

एरवीं त्या मानवाची उत्पत्ति न पसंत;
—गंधर्वांत–अप्सरांत–हें ' उघडें गुपित ' !

* * *

कांहीं असो, यमी वांचे !—

* * *

—गर्भ तोही वांचला !—
मानवाचा वंश आतां अमरता पावला !

( क्रमानें सर्व प्रेक्षक बाहेर पडतात. नाटकगृह रिकामें होतें. अखेर दिवेहि विझवले जातात. )

## तीन आवाज : : मुक्तछंद

पहिला आवाज :

अवकाशांत फिरफिरती
तेजोगोलक, धूमकेतूही,
आणि अद्‌भुत ते तेजोमेघ !
—या सर्वांमधें रसरसतें जें तेज
तयांतील मी संहारकाल.
ळळळळत्या, वळवळत्या
ज्वालांच्या माझ्या लांब जिभांनीं
समोर येई तें तें लोटितों उदरीं !
ज्या तेजोगोलीं तीव्र उष्णता वसते,
त्यांवरी कैसा जीवसंभव होईल ?
भूलोकावरी जन्म घेणाऱ्या आत्म्यांनो ! —
मला स्मरून सरा परते !
कधीं एखाद्या तेजोमेघाची, धूमकेतूची,
धरेशीं जरी धडक होई,
तरी उरेल तेथ चेतन—आणि जडही—कोठलें ?
—भंगुर अशा जगीं जन्म कां घ्याया वांछितां ?

दुसरा आवाज :

अवकाशांत फिरफिरती
विझून कोळ झालेले गोल !

—जसे काय ते द्यौपुरुषाचे फुटके डोळे !
त्या गोलांतल्या कितेकांवरी
थंडी पडते अति दारुण !
—वर्फालागींही हुडहुडीच भरेल तेथें !—
—त्या थंडींतील संहारकाल असे मी.
तेजोगोलांच्यापासून दूर अनंतामधें
अशीच तीव्र थंडी वसते !
—या शीत प्रांतीं जीवसंभव कैसा होईल ?
भूलोकावरी जन्म घेणाऱ्या आत्म्यांनो !—
मला स्मरून सरा परतें !
युगांतीं जेव्हां सूर्य तुमचा होईल गार,
जाईल ना रे तेव्हां अवघें गोठून ?
—विश्व असेंच व्हायचें अंतीं वैराण !—
—भंगुर अशा जगीं जन्म कां व्याया वांछितां ?

### तिसरा आवाज :

भूलोकावरी जन्म घ्यावया
आम्ही आतुर आत्मे सकल !
सर्वनाशाचें भय दावितां आम्हां कशाला ?
जळेल तेव्हां जळो वसुधा;
वठेल तेव्हां वठून विश्व होवो वैराण !
जीवनानंद आज आम्हांला घेऊं द्या !—
उद्यांचें उद्यां !
अहाहा ! काय जगण्यांतली माधुरी !
—तीच सकल सुखाची सीमा !—
—तीच सकल आशांची पूर्ती !—
असो असलें जड शरीर भंगुर,

अमरतेची हांव परंतु कुणाला ?
—मृत्यूला जो भी तयाला !
जीवनानंद जरी लाभला एकच क्षण,
तरीही मुर्दे वरूं शतदां मृत्यूला !
—जन्म घेण्याच्या आड आमच्या कां मग येतां ?—

**मृत्युकिरण**—एकांकी नभोनाट्य : : 'मुक्तशैली'

१

**नभोवाणी :**

नभोवाणी ही... देशाची !
बोलतों आहोंत आम्ही...केंद्रावरून !
आलें आहे नाशिबीं आमच्या शोकवृत्त सांगणें,
पण निरुपाय आहे आमचा !
आपल्या देशाचे—छे, सर्व जगाचे—
थोर विज्ञानवेत्ते...नुकतेच पावले निधन !
झाले होते ते स्वतःच्या घरीं आजारी,
नेलें होतें त्यांना आपल्या सरकारनें
उपचारार्थ दूर—अज्ञात स्थलीं—एकांतवासांत !
—किती दयाळू सरकार !—
—किती विद्वानांचा परामर्श घेणारें !—
पण आलें नाहीं यश सरकारच्या हाताला,
मावळला अखेर ज्ञानसूर्य !

(तंतुवाद्यावर शोकस्वर ऐकूं येतात.)

२

**विज्ञानवेत्त्याची पत्नी :**

विज्ञानवेत्ते... यांची मी पत्नी !

—नभोवाणीवरून काय हें मीं ऐकलें ?—
—खरेंच कां मी मुकलें माझ्या पतींना ?—
—खराच कां झाला माझा सर्वस्व–नाश ?—
—पण–पण ही निधनवार्ता खोटी ठरण्याइतकी
मी सुदैवी कुठें आहे ?
(स्फुंदते. पण लगेच सांवरते.)
नभोवाणी सांगते, माझे पति आजारानें गेले !
परंतु होताच कुठें मुळांत त्यांना आजार ?
असेल त्यांना मारलें गोळ्या घालून चांडाळांनीं,
आधीं छळून घेऊन परोपरीनें !
—कसलें हें दयाळु सरकार ?—
—कसलें विद्वानांचा परामर्ष घेणारें ?—
आहे हें हुकूमशाही, मानवताद्रोही सरकार—
निरपराध्यांच्या रक्तास चटावलेलें,
अन् वर अनृत–प्रचार करीत सुटणारें !

आठवते मला ती भीषण रात्र,
नेलें जेव्हां माझ्या पतींना घरांतून दुष्टांनीं !
होते ते सशस्त्र सैनिक वीस–पंचवीस,
आणली होती त्यांनीं जाळीदार मोटार;
रोखलीं त्यांनीं पिस्तुलें आम्हां सर्वांवर,
बसविलें माझ्या पतींना जबरीनें मोटारींत !
म्हणाला मला त्यांचा मुखंड जातां जातां :
" याद राख यांतलें अक्षरहि बाहेर गेलें तर— !
सांगत जा, तुझा पति एकाएकीं आजारी पडला,
अन् सरकारनें त्याला उपचारार्थ नेलें म्हणून ! "
—आली तशी वावटळ परत गेली,
पण केला तिनें माझा संसार कायमचा उध्वस्त !

वर्ष—बरोबर वर्ष—झालें त्या घटनेस :
नाहीं लागूं दिला थांग पतींचा या अवधींत !
आतांच पहिल्यानें कळली त्यांची बातमी,
नि ती देखील मृत्यूची !

गुन्हा ? — कसला गुन्हा करणार ते ?
अहोरात्र चालायचा मृत्युकिरणांचा शोध,
मग गुन्हे करण्यास वेळ कुठला ?
—अन् तशी प्रवृत्ति तरी कुठली ?—
होय, म्हटला तर एक महान् अपराध
केला होता माझ्या पतींनीं !
होते ते उपासक देवी मानवतेचे,
नाहीं करूं दिला त्यांनीं हुकूमशहाला
मृत्युकिरणांनीं मानवसंहार !
—बस, हाच त्यांचा गुन्हा !—हाच देशद्रोह !
त्याचसाठीं नेलें त्यांना घरांतून जुलमानें,
ठेवलें डांबून वर्षभर अज्ञात ठिकाणीं,
अन् केलें अखेरीस बहुधा ठार !

—कसा सहन करूं मी हा आघात ?—
कसें कंठूं हें एकाकी, भारभूत जिणें ?—
( ओक्साबोक्शी रडते. )

३

**हुकूमशहा :**

मी हुकूमशहा...देशाचा !
ऐकली मीं आतांच नभोवाणी !
—दूरध्वनिक्षेपकानें ठाऊक होतेंच आधीं सारें !—

पडला पडदा शेवटला या नभोवाणीनें
विज्ञानवेत्त्याच्या जीवन–नाटकावर !

विज्ञानवेत्ता...प्रतिभाशाली खराच !
लावला त्यानें शोध मृत्युकिरणांचा
प्रयोगशाळेंत अविरत खपून !
सांगितलें मीं त्याला अणुगोलासारखें
'शस्त्र' करून देण्यास मृत्युकिरणांचें !
माझ्या देशाचें साम्राज्य जगभर पसरल्याचें
एकंच एक स्वप्न आलों आहें मी पाहत !
होती हीच सुवर्णसंधी तें साकार होण्याची !
—परंतु नाहीं झाला कबूल विज्ञानवेत्ता;
करूं लागला, उलट, गोपन मूळ शोधाचेंच !
आलें आड त्याचें मानवता–प्रेम,
वाटला त्याला अमानुष भावी मानवसंहार !
समजाविलें मीं त्याला परोपरीनें,
दाखविलीं आमिषें, दाखविला धाक !
वर्षभर ठेवलें त्याला अज्ञात स्थलीं बंधनांत,
केला त्याचा छळहि केवळ आसुरी !
परंतु खुळाच तो !— तो काय बधणार ?
दिला मीं शेवटीं हुकूम अधिकाऱ्यांना
त्याला गोळ्या घालून ठार मारण्याचा !
प्रत्यक्ष हुकूमशहाची अवज्ञा, साक्षात् देशाचा द्रोह,
प्राणघातक ठरल्यावांचून राहील तरी कसा ?

—नको आहे हें बाहेर कुणाला कळायला,
म्हणून चालविला आहे नभोवाणीवरून
आम्हीं नेहमींप्रमाणें अनृत–प्रचार !

पाहूं, विज्ञानवेत्त्याच्या सहकाऱ्यांतून शोधूं
मृत्युकिरणांचें शस्त्र बनविणारा—
नि माझें जीवनस्वप्न आकारास आणणारा !
तूर्त झाले आहेत मृत्युकिरण कारणीभूत
त्यांच्या शोधकाऱ्याच अकाल निधनाला !
( विकट हास्य करतो. )

४

**विज्ञानवेत्त्याचा आत्मा :**

विज्ञानवेत्ता... याचा मी आत्मा !
पडला असेल बळी माझा देह पिस्तुलांना,
परंतु नाहीं ना पडलें बळी माझें मन
हुकूमशहाच्या आमिषांना वा धाकांना ?

लावला मीं शोध मृत्युकिरणांचा
सृष्टींतून ऐकूं आलेल्या हांकांमुळें !
दडलीं आहेत सृष्टींत अनंत रहस्यें,
होतात तीं उतावीळ प्रगट व्हायला,
घालतात साद उच्च रवानें—पण नीरव !—
येते ती ऐकायला फक्त प्रतिभावंतांना !
—अशीच एक हांक आली माझ्या कानांवर,
लागलों शोध करायला मृत्युकिरणांचा !
जेव्हां मीं केलें उग्र तप तपभर,
तेव्हां कुठें झालें तें रहस्य प्रगट माझ्यापुढें !

कळला माझा शोध हुकूमशहाला,
लावली त्यानें निकड बनविण्याची
मृत्युकिरणांचें संहारक युद्ध–शस्त्र !

होतों मी उपासक मानवता—देवीचा,
होतें ठरलें माझें त्याच देवतेच्या चरणीं
मृत्युकिरणांचा शोध अर्पण करण्याचें !
—कशी मग पाळणार आज्ञा हुकूमशहाची ?—
टाकला मीं दडपून अर्धामुर्धा शोध,
नव्हता तो पुरता ठाऊक माझ्या सहकाऱ्यांनाहि !
—म्हणूनच झेलाव्या लागल्या गोळ्या
मला आपल्या देहावर,
अन् झाली त्याची मच्छरदाणी !

—हे हुकूमशहांनो !—हे सत्ताधाऱ्यांनो ! १२
करा तुम्ही कितीहि अनृत-प्रचार,
नाहीं राहणार बाहेर आल्यावांचून
कधीं ना कधीं सत्य !

कळेल माझी कहाणी जगाला केव्हां तरीं,
होतील जागे सारे विज्ञानवेत्ते;
बनतील ते उपासक देवी मानवतेचे,
करतील केवळ तिचीच सेवा
परोपरीचे अद्भुत शोध लावून !

( 'तथास्तु !— तथास्तु '!— असे शद्ब उमटतात. तंतुवाद्यावर आशाप्रेरक स्वर ऐकूं येतात. )

**कुत्र्याची तंगडी**— स्वगतक : : 'मुक्तशैली'

" होय, ही कुत्र्याचीच तंगडी !—
त्यांतहि चांडालाच्या घरची,

आणि शिवाय चोरून आणलेली !
या तंगडीला चिकटलेलें
कुत्र्याचें निषिद्ध मांस
मी आज खाणार !
—पुनः सांगतों, आज खाणार !

“ असेन, मी विश्वामित्र असेन,
उग्र तप केलेला असेन,
क्षात्रियाचा ब्राह्मण झालों असेन,
मंत्रद्रष्टा ऋषि असेन !
तरी पण हें चांडालाकडलें,
चोरून आणलेलें,
कुत्र्याचें निषिद्ध मांस
मी आज खाणार !

“ तब्बल बारा वर्षें झालीं :
पावसाचा बिंदु नाहीं !
नदी-नाले सुकले,
झाड न् झाड वठलें,
माणसांना माणसें खाऊं लागलीं,
तींहि आतां संपत आलीं !
कैक दिवस झाले :
तोंडांत पाण्याचा थेंब नाहीं,
अन्नाचा कण नाहीं !
कसा धीर धरूं ? – किती मन आवरूं ?
आज मी पाप करीत असेन;
पण जगलों-वांचलों,
तर उद्यां पुनः तप करीन—

पुण्य मिळवीन !
उद्यांच्या पुण्यासाठीं
आजचें पाप अटळ आहे !

" मानव ! – किती विचित्र मानव !
मानवाचा देह मातीचा,
पण आंत धगधगती ज्योत !
मातीचा देह मातीच मागणार !
त्याला तहान आहे, त्याला भूक आहे,
त्याला काम आहे, त्याला क्रोध आहे !
आंतली ज्योत बाहेरच्या मातीवर
एका मर्यादेपलीकडे
कुठून विजय मिळविणार ?
या मातीला लागलेली
मातीची अनावर क्षुधा
निर्वाणीच्या घटकेला
पुरविलीच पाहिजे !
ही मातीची खोळ उभी आहे,
तोंवरच आंत ज्योत आहे !
ही खोळ गळून पडतांक्षणींच
आंतली ज्योत विझेल,
अनंतांत विरून जाईल !
या ज्योतीसाठीं तरी
माती टिकवायला नको कां ?

" झालें तर मग !—
म्हणून पुनः सांगतों :

चांडालाच्या घरचें,
चोरून आणलेलें,
कुत्र्याचें निषिद्ध मांस
मी आज खाणार ! "

## विचारांचें बंड—एकांकी नाट्यकाव्य : : मुक्तछंद

[ आकाशगंगेपलीकडील अवकाशामधल्या अज्ञाताच्या गुहा. पृथ्वीवरून नुकतेच आलेले 'तत्त्वज्ञानाचा विचार', 'ललितकलांचा विचार' व 'विज्ञानाचा विचार' हे त्या गुहांत शिरणार, तोंच अदृश्य आदिशक्तीचा हुकमी आवाज त्यांच्या कानांवर आदळतो आणि ते जागच्या जागींच थबकतात. ]

**अदृश्य आदिशक्तीचा आवाज :**

विचारांनो ! घ्या पाऊल मागें तुम्ही आपुलें !
थांबा, न शिरा अज्ञाताचिया गुहांभीतरी !
भूलोकाप्रति तुम्हांलागीं मीं होतें धाडलें
मानवा द्याया नवनवीन विचार
शिरून त्याच्या अंतरंगांत त्या न कळतां :
परंतु कसे परत आलां तुम्ही तेथून ?
घेतली होती काय आगाऊ माझी अनुज्ञा ?
काय वाटलें : सर्वज्ञेलागीं मजला
बंड तुमचें नच व्हायचें कधींच ज्ञात ?

**तत्त्वज्ञानाचा विचार :**

आदिशक्तिके ! घडे आमुच्या हातून गुन्हा :
तुझी अनुज्ञा न घेतां आलों भूलोकांतून !
परंतु होता उपाय दुजा कोणता ?

निरुपायानें अनुज्ञेवीण निघालों,
आलों आमुच्या अज्ञाताचिया गुहांतें
पहिल्यापरी त्यांत वसति कराया.
परी गुहांच्या मुखाशींच गे तूं अडविशी !
—क्षमायाचना कराया शब्द नच सुचती !—

### अदृश्य आदिशक्तीचा आवाज :

भूलोकीं काय संकट आलें तुम्हांवरतीं
ज्यामुळें तुम्ही तेथून आलां तांतडी ?
कळूं द्या तरी !—

### तत्त्वज्ञानाचा विचार :

मानवा मुळीं नसे आमुची गरज !
भाकरीच्या तो मागें सारखा लागला !
कोणताही त्या सुचत नसे विचार !
भूलोकीं मग रहावयाचें आम्हीं कशाला ?
उपेक्षिताचें जिणें कंठावें कुठवरतीं ?
म्हणून आम्ही परत आलों लगबगीनें
अनुज्ञा तुझी आधीं घ्यायचें नुरुन भान !

### ललितकलांचा विचार :

विश्वजननी ! बोलतों त्याची असावी क्षमा :
मानव चित्तीं भाकरीचा घे एकच ध्यास !
जेथें–तेथें तो भाकरीलाच पाहतो !
ललितकला क्षम द्यावया विशुद्धानंद,
परी मानवा विशुद्धानंद नको कसला !
हव्या तयाला सकल कला राबवायला
भाकरीसाठीं !—
गानकलेनें भाकरीचेंच गावें गायन,

काव्यकलेनें भाकरीचाच द्यावा संदेश,
—यापरी धरी मानव हेतु अंतरीं !
कशाला मग वास करावा भूलोकांत मीं ?

**विज्ञानाचा विचार :**

—अशीच आहे मानवावरी माझी फिर्याद !
विज्ञानें सारीं भाकरीसाठीं
राबवावया पाही मानव !
विज्ञानांतला उच्च आनंद तयास नको !
जें विज्ञान त्या हो साह्यभूत
पैदा कराया त्याची भाकरी,
तेंच त्याजला इतरांहून गमतें श्रेष्ठ !
कशाला मग मींही रहावें भूलोकामधें ?

**तत्त्वज्ञानाचा विचार :**

तत्त्वज्ञानाची अस्मानांतली स्वैर भरारी
नच पेलत–न रुचतही–मानवालागीं !
" विश्वनिर्मिति काय हेतूनें जाहली ?
विश्वीं कशाला मानव आला जन्माला ? "
—प्रश्न असले मानवा झाले पारखे !
' तत्त्वज्ञाना 'चे त्याचे अवघे विचार
भाकरीभोंतीं गरगरती—भिरभिरती—!
—भाकरी हेंच परब्रह्म हो तयाचें !–
याच कारणें मीं त्याजियला भूलोक !

**अदृश्य आदिशक्तीचा आवाज :**

विचारांनो ! मीं घेतलें सारें ऐकून :
परंतु माझें समाधान ना जाहलें !
भाकरीलागीं हीन लेखितां कां तुम्ही ?

छे, छे, तुम्हांला वाटे त्यापरी
नाहीं भाकरी हीन खचित !
नाहीं तशीच जडवादाचें प्रतीकही ती !
विश्वामधला अणूही जर न असे जड,
तर उरला ' जडवाद ' तो कुठला ?
—विश्व अवघें आहे भरलें चिद्रसें !—
आणिक हाही आणा मनांत विवेक :
मानवदेह रक्तमांसाचा बनला;
रक्तमांसाच्या देहास लागे भाकरी.
कसा मानव त्या भाकरीचा न घेई ध्यास ?
परंतु त्याच्या देहाची भूक शमतांक्षणीं
लागेल तया कडकडून आत्म्याची भूक !
सहजच तो वळेल मग तुम्हां सगळ्या
विचारांकडे !
विचारांनो ! कां नच धरतां धीर तोंवरी ?
जा, जा सत्वर आलांत तसे भूलोकीं :
रहावयाचें आहे तिथेंच यापुढें तुम्हां !
अज्ञाताचिया गुहांमधली वसति
तुमची केली बंदच आतां सदाची !
—बंडखोरीला तुमच्या हेंच शासन ! —
जा, भूलोकातें, जा लवलाही !

**सर्व विचार मिळून :**

आदिशक्तीची आज्ञा प्रमाण !

( अज्ञाताच्या गुहा पाहतां पाहतां नष्ट होतात व तेथें अवकाशाची पोकळी तेवढी शिल्लक उरते ! ' तत्त्वज्ञानाचा विचार ', ' ललितकलांचा विचार ' व ' विज्ञानाचा विचार ' हे त्या पोकळीकडे पाहून कपाळावर हात मारून घेतात आणि खालीं माना घालून जड पावलांनीं पृथ्वीकडे जाण्यास निघतात. )

**स्वप्नदृश्य**—एकांकी नाट्यकाव्य : : 'मुक्तशैली'

[ मध्यरात्रीची वेळ. दूरवरच्या क्षितिजावर प्रकाश दिसूं लागतो. त्यांतून दोन आकृति हळूंहळूं प्रगट होतात. नभोदेव व वसुंधरा यांच्या त्या आकृति होत. ]

**नभोदेव** : देवी वसुंधरे !
**वसुंधरा** : काय, नभोदेव ?
**नभोदेव** : आहेस ना तूं अजून जागी ?
**वसुंधरा** : कधीं नसतें मी जागी, नभोदेव ?
**नभोदेव** : आलों आहें मी मध्यरात्रीच्या निवांत वेळीं
प्रदीर्घ चुंबनें तुझीं घ्यायला क्षितिजावर वांकून !
दिवसाहि मी तसें करायला जातों;
पण कुणा–ना–कुणा मानवाला तें दिसून
येतो तो क्षितिजाकडे आपला प्रणय पहायला,
पळत सुटतें तें क्षितीज त्याजपासून दूर दूर—
जेव्हां मी संकोचून तुला सोडून वर सरतों !
आतां मध्यरात्रीं तरी निद्रादेवीच्या बाहुपाशांत
असतील ना सारे मानव बद्ध झालेले ?
**वसुंधरा** : छे, कसले होतात ते सारेच निद्रामग्न ?
अहोरात्र चालू असतें या–ना–त्या मानवाचें
सशब्द अथवा निःशब्द आक्रंदन !
कैक मानव अजूनहि आक्रंदत जागे असतील !
—मुकलें आहें मी झोंपेला कायमची त्यामुळें !—
**नभोदेव** : झालें आहे तरी काय मानवाला आक्रंदायला ?
**वसुंधरा** : वैफल्यानें पछाडलें आहे अलीकडे मानवाला !
वाढली आहे त्याची प्रज्ञा, वाढली आहे 'जाणीव,'
पण त्याबरोबरच वाढली आहे विफलता देखील !
"विश्वमालेंत आपण आहोंत क्षुद्रतम;

आहे आपली उत्पत्ति ' अपघाता 'नें झाली,
होणार आहे आपला लयहि ' अपघाता 'नेंच !"
—अशी झाली आहे कल्पना प्रज्ञावंत मानवाची
आणि म्हणून तो ग्रासला गेला आहे वैफल्यानें !

**नभोदेव :** वा रे प्रज्ञावंत मानव ! वा रे त्याची विफलता !
खऱ्या प्रज्ञेच्या पोटीं काय वैफल्य निपजतें ?

( मोठमोठ्यानें हंसतो. त्यासरशीं आकाशांतून तारे तुटूं लागतात ! )

**वसुंधरा :** अहाहा ! प्राणनाथ ! तुमच्या दिव्य हास्यानें
पहा कशीं झडतात हिरे-मोत्यें अंतरिक्षांतून !
निवूं द्या, आणखी एकवार असेंच गोड हंसून
माझे डोळे निवूं द्या !

( नभोदेव पुनः हंसतो. पुनः आकाशांतून तारे तुटूं लागतात ! वसुंधरा आनंदित होते. )

**नभोदेव :** प्रिये, कळला नाहीं मानवाला आपल्या उत्पत्तीचा हेतु,
कळलें नाहीं त्याला विश्वमालेंतील स्वतःचें स्थान !
सर्व विश्वमालेची मिळून एकच एक महान् घटना
घडून राहिली आहे अनादिकालापासून :
दूर अनंतांत नवा तारा जन्माला येवो,
किंवा भूलोकांत वृक्ष--पर्ण गळून पडो,
—आहेत हीं अवघीं अंगें-प्रत्यंगें
त्या एकाच महान् घटनेचीं !
याच घटनेंत कुठें तरी आहे मानवाचें स्थान !
पण समजतो तो आपल्याला सलग, स्वतंत्र !
कां न मग व्हावी त्याची दारुण निराशा ?
कां न तो ग्रासला जावा विफलतेनें ?

**वसुंधरा :** कांहींच कां नाहीं उपाय हें वैफल्य जाण्याचा !

नभोदेव : नाहीं कसा ? — आहे, रामबाण उपाय आहे,
अन् तो देखील मानवाजवळच !
" आहोंत आपण घटक एका महान् घटनेचे;
आपली उत्पत्ति, आपली स्थिति, आपला लय
—आहेत हीं सर्व अंगें त्या घटनेचीं;
मूलतःच आहे ही महान् घटना
विकासाकडे जाणारी, मांगल्यांत परिणत होणारी;
—मात्र नाहीं हा विकास आपल्या एकट्याचा !—
—नाहीं हें मांगल्य आपलें एकट्याचें !—
आहेत तीं दोन्ही साकल्यानें विश्वमालेचीं !
सर्व विश्वमालेचा व्हावा अखेर विकास,
सर्व विश्वमालेचें व्हावें अखेर मंगल,
म्हणूनच झाली आहे आपली उत्पत्ति,
म्हणूनच होणार आहे आपला लयहि ! "
—अशी श्रद्धा बाळगावी मानवानें मनोमन,
क्षणांत होईल मग तो विफलतेंतून मुक्त !
लाभली आहे मानवाला दैवी प्रज्ञा, दैवी ' जाणीव, '
घ्यावें त्यानें समजून त्या महान् घटनेचें स्वरूप,
ओळखावें त्यानें तिच्यांतलें आपलें स्थान,
व्हावें त्यानें साक्षीभूत चालू घटनेला,
मानावा त्यानें आनंद जें जें घडेल त्याचा;
—हाच एकमेव आहे मानवी जीवनाचा हेतु !
वसुंधरा : निजलेल्या आणि जागृत असलेल्या मानवांनो !
होवो हें ज्ञान संक्रमित तुमच्या अंतःकरणांत
आणि पावो शमन तुमची अंतरींची आग !
नभोदेव : देवी, पुरे झालें आतां हें ' मानव—पुराण ' !
जो हेतु धरून मी या निवांत वेळीं आलों,

तो सफल होण्याची संधी साधूं दे मला —
आहेत जोंवर बहुतेक मानव झोंपलेले,
नि नाहीं जोंवर होत त्यांचा आपणांला प्रत्यवाय !
ये, अशी लाजूं नकोस !

( नभोदेव वसुंधरेला आपल्या बाहुपाशांत दृढ धरून एका हातानें तिची हनुवटी वर उचलतो. तोंच त्या उभयतांच्या भोंवतीं प्रकाश उत्पन्न होऊन त्यांत त्यांच्या आकृति हळूंहळूं विलीन होतात आणि फक्त क्षितीज तेवढें दिसूं लागतें ! )

दिग्दर्शक ( प्रवेशून ) : पाहिलें तुम्ही, प्रेक्षकांनों, हें जें दृश्य,
तें आहे स्वप्न एका कवीला झोंपेंत दिसलेलें !
होता तो कवि रात्रीं अंथरुणावर पडलेला,
दिसलें त्याला खिडकींतून तारकांकित आकाश,
वाटलें त्याला तें कोळिणीच्या जाळ्यासारखें :
—ज्या जाळ्याची आदिशक्ति अदृश्य कोळीण आहे—
—जें जाळें कर्षणाच्या तंतूंनीं बनलेलें आहे—
—ज्या जाळ्यांत तारा--कीटक गवसले आहेत—
—आणि ज्या जाळ्यांत गवसल्या आहेत
तेजोमेघांच्या चित्रविचित्र फकड्या देखील !—
विराट् गगनाच्या विराट् दर्शनानें,
अन् त्यावरच्या या विराट् कल्पनास्फुरणानें
जाणवली कवीला मानवाची असीम क्षुद्रता,
आणि खोल जाऊन रुतली ती त्याच्या मर्मबंधांत !
झालें उदित वैफल्य सहजच त्याच्या हृदयांत,
पडला तो तळमळत मध्यरात्रीपर्यंत झोंपेवांचून !

त्यानंतर कुठें लागला त्याचा क्षणभर डोळा,
तोंच पडलें हें स्वप्न त्याला द्यावापृथ्वीचें !
या स्वप्नदृश्याचें यथामति दिग्दर्शन करून
सादर केलें आहे, प्रेक्षकांनो, मीं तें आपणांपुढें.
संपलें आतां माझें काम, घेतों मी आपली रजा.

( जातो. पडदा पडतो. )

## होतांच उजळ आभाळ !

: : जाति– उद्धव (बदलून)

होतांच उजळ आभाळ
दारार्शी वाजिव शीळ ! ध्रु०

कोंबडा बांग दे जेव्हां मी जागी होतें तेव्हां !
झुंजुरका तूंहि उठून मोटिचे बैल घेऊन—
जा गुंगत मंजुळ गान माझिया झोंपडीवरुन !
ती साद तुझी ऐकुन
मी तुजसंगें येइन !
करुं विहार दोघेजण !
—मी गोपी, तूं गोपाळ ! दारार्शी वाजिव शीळ ! १

आइच्या आस ही जीवा : कुणि कुबेर जांवइ व्हावा !
ती भुलते रत्न-मण्यांला, भुललें रे मी प्रीतीला !
वाहिला जीव तव पायीं ! —दे रुकार अंतीं आई !
तेजाळ नयन तव किती !
रत्नांच्या राशींप्रती—
क्षणिं कळाहीन बनविती !
—त्यां दृष्टच मम होईल ! दारार्शी वाजिव शीळ ! २

चालव तूं मोट मळ्यांत होउं दे तया टवटवित !
मी बसेन जवळच तेथ मोटीची मौज पहात !
कण शिरला नयनीं म्हणुन सांगेन बहाणा करुन !
येशील मोट टाकुनी
कर हनुवटीस घालुनी
फुंकिशील मम लोचनीं !
झिणाझिण्या गोड येतील ! दारार्शी वाजिव शीळ ! ३

रवि येतां माथ्यावरतीं न्याहरी करूं सांगातीं :
कोरड्यास नलगे कांहीं चुंबनेंच घेई–देई !
—त्याविना ध्यायची नाहीं मी तुझा घांस केव्हांही !—
मी म्हणेन ‘ मोहन ’ तुला,
म्हण ‘ राधा गौळण ’ मला !
वाटुनी हिरस आपुला—
जन तिळतिळ मनिं तुटतील ! दाराशीं वाजिव शीळ !

## कलेचा जन्म

: : छंद्–कपिवीर

१

“ गायका ! तूं गीत गाशी कीं ओतिशी सुधेचा कलश ?
मधुरता स्वरांतली अलौकिक गमते मनास !
देवांचा कां गवई तूं ?— गंधर्वांच्या लोकीं काय वास ?
तरीच कां तेथली ये गोडी तुझ्या येथल्या गानास ? ”

“ छे, गंधर्व--लोकांतून आलों काय--हें नच विदित;
ठावें मात्र कोलाहलीं कंठितों मी संप्रति जीवित !
अस्फुटच परि कांहीं आठवती मज दिव्य सूर
कंठांतून मानवी ते हुबेहूब कैसे निघणार ?
तयांसाठीं मोरापरी जीव माझा लागे झुरणीतें
पडसाद तरी त्यांचे वठवाया घेतों आलापांतें !
ध्वनींतली माधुरी ती प्रतिध्वनीमधें येई कैंची ?
कां मग ही मजवरी वृष्टि वृथा स्तुति--सुमनांची ?
होता तरी व्हा हर्षित गायनातें मम परिसून
सांगतों मी सत्य, माझी दुःखांतून कला घे जनन ! ”

२

" चित्रकारा ! न कळे तूं चित्रकार किंवा जादुगार !
रेखियलें चित्र तुवां स्वप्नाहून अतीव सुंदर !
देवांचा कां चितारी तूं ? – नंदनांत काय तुझा वास ?
तरीच कां तेथली ये शोभा तुझ्या येथल्या चित्रास ? "

" छे, नंदनवनांतून आलों काय– हें नच विदित;
ठावें मात्र ओसाडींत कंठितों मी संप्रति जीवित !
अंधुकच परि कांहीं आठवती मज दिव्य भास
तूलिकेस कोठोनी ते हुबेहूब येती चित्रायास ?
तयांसाठीं मोरापरी जीव माझा लागे झुरणीतें
प्रतिकृति तरी त्यांची वठवाया काढतों चित्रातें !
बिंबांतली रम्यता ती प्रतिबिंबामधें येई कैंची ?
कां मग ही मजवरी वृष्टि वृथा स्तुति–सुमनांची ?
होता तरी व्हा हर्षित आलेख्यातें मम विलोकून
सांगतों मी सत्य, माझी दुःखांतून कला घे जनन ! "

## अपुरी माळ

: : छंद— भुवनसुंदर

सख्या ! इतुकी घाई तुला कसली होई ?
थांब, नको रे जाऊं माळ अपुरी राही !
फुलें गुंफूं दे आतां नको तुडवूं जातां —
माळेपरिस माझें भग्न हृदय तेंही ! १

सदा रुचलीं तुला त्याच वेंचिलें फुलां;
—कसा रुसवा असा आला तुजला बाई ! —

पुरी होतांच माळ गळां आपुल्या घाल —
तोच सोहळा डोळां मला विलोकूं देई ! २

नाहीं वळेंच केला वेळ गुंफाया माला,
हात चाले ना, कांपे ! —काय करूं मी तरी ? —
लोट आंसवां येई, क्षण दिसेना कांहीं,
सख्या ! म्हणूनही रे माळ राही अपुरी ! ३

काय येईना दया ? होशी अधीर जाया !
हीच विनंती अंतीं : —ऐक तितुकी जरी ! —
लाव हृदयीं माला म्हण आपुली तिला !
—राहो अपुरी राहे ! — —चिंब आंसवें जरी ! — ४

## ध्यास

: : छंद--‘ बादल ’

निळें निळें--आभाळ काळें काळें--बादल; १
जल काळें--नदीचें --हृदयच--खलाचें ! २
विहरती--नदींत बलाकांचे--संघात : ३
कलकल--करिती बागडती--खेळती, ४
मिटूनिया--नयनें तरंगती--डौलानें ५
—नावा जणूं--रुपेरी जलराणी--हांकारी ! ६

अवचित--त्यांतील उडे एक--युगल, ७
घेत घेत--मंडलें उंच उंच--चाललें ८
पार्श्वभूमी--काजळी वर--खालीं--रेखिली, ९
तिजवरी--नेटके दोन शुभ्र--पुंजके १०
उंच उंच--आणीक झेंपावती--निःशंक ! ११
छे, न पोंचे--नजर लहान हो--आकार १२

दोन पुंज--लोपले एकमेकीं--मिळाले १३
एकाकार--भासती —अद्वैताची--प्रतीति ! १४

सखये ! हें--पाहून वेडावलें--मन्मन : १५
मी--तूंपण--लोपून एकरूप--आपण १६
कधीं होऊं—यापरी ध्यास हाच--अंतरीं ! १७

## उग्र हो !

: : वृत्त—अनुष्टुभ्

मंदिरास तुझ्या देवी ! वेढुनी बसला अरी
भक्त धांवुन आलेले मरती शलभापरी ! १
स्तब्ध कां अजुनी ऐशी ? – अरी हा मूर्तिभंजक !
सर्वज्ञेस तुला कैसें नसेल तरि ठाउक ? २
गदा घेउनिया हातीं क्षणीं येइल मंदिरीं,
घाव घालील वेगानें तुझिया मस्तकावरी ! ३
देवि मानवते ! तूं गे असशी प्रेमरूपिणी
परी हो सह्य ही कैशी अवज्ञा तुजलागुनी ? ४
“ असतील हिरे–मोत्यें दडलीं मूर्तिभीतरी
भग्न होतां करीं येतीं !— ” आस हीच तदंतरीं ! ५
सोमनाथ न हें, आहे हें अजेयच मंदिर—
शिवमूर्ति न ही, आहे देवि वन्हिच दुर्धर— ६
दाखवी अरिला ऐसें कराया सत्त्वरक्षण,
सौम्यता सोडुनी थोडी उग्रता करि धारण ! ७
कोटि कोटि भुजा तूंतें, कोटि कोटि शिरेंहि तीं,
तुझियापुढतीं त्याची पामराची कथा किती ? ८
नको खड्ग तुला घ्याया, नको गे शूलही मुळीं,
कटाक्षेंच तुझ्या एका कोसळेल महीतळीं ! ९

मरतां मरतां आभा निघूं दे तन्मुखांतुनी,
त्वन्मुखीं लीन होऊं दे ती त्यामाजी प्रवेशुनी ! १०
बिंदु सिंधूतला तेणं जेथचा तेथ जाइल,
' प्रेमस्वरूपिणी '—हेंही ब्रीद कायम राहिल ! ११

## आशा

: : छंद—शुद्धसती ( त्रिपदी )

वसुधेचें लग्न स्वर्गाशीं जाहलें विश्व आनंदलें ! १
रत्न--करंडक देवानें दोघांला आंदण दिधला. २
सांगे उभयांला " उघडा न याला राहूं द्या झांकला !" ३
करंडकामधें ' सुखें ' वेगळालीं होतीं भरलेलीं. ४
उत्सुक वसुधा उघडून पाही देवें वारितांही ! ५
उघडतांक्षणीं सुखें तयांतलीं उडोनिया गेलीं ! ६
स्वर्ग हें पाहून रुसोनिया गेला, पुन्हां नच आला ! ७
शोक वसुधेला जाहला अतीव ! --देवास ये कींव ! ८
'आशा' भरूनिया नव करंडक देई तिज एक. ९
करंडकालागीं वसुधा जपते, झांकून ठेविते ! १०
--आशेचाच आतां आसरा तियेला जिणें कंठण्याला ! ११

## विचारांचें गाणें

: : छंद– भुवनसुंदर ( शिथिल )

आम्हि तरल विचार् आम्हि विरल विचार्,
विश्विं स्वैर फिरणार् गूढें सर्वां कथणार् !
कोण आडवें येणार् ? —आम्हि काय मानणार् ?
सर्वदूर फिरणार् विश्वें उणिं करणार् ! १

मूलशक्ति विश्वाधार् तिचे आम्हि शिलेदार्
तिचा शब्द पाळणार् विश्वि स्वैर फिरणार् !
गूढें सर्वां कथणार् जया कळे तो घेणार् !
प्रज्ञा विजयि होणार् अंतिं कोडें सुटणार् ! २

विश्वें अनंतिं अपार् त्यांत अमुचा संचार् :
क्षणिं या विश्विं येणार् क्षणिं त्या विश्विं जाणार् !
मनोवेग अनिवार् आम्हांपुढें हरणार् !
विश्वें उणिं करणार् सर्वगामी बनणार् ! ३

विश्विं करितां संचार् कुणि तारा भेटणार् —
तीतें वय पुसणार् तिचें तेज मापणार् !
धूमकेतु दिसणार् त्याचें पुच्छ ओढणार् !
ग्रहमाला भेटणार् --क्षणिं भूतला येणार् ! ४

मानवांशिं क्रीडणार् हृदिं त्यांच्या शिरणार् :
गूढें कुजबुजणार् कांहिं मात्र कळणार् !
प्रज्ञा पुढें वाढणार् तेव्हां सारें कळणार् !
श्रेय मानव घेणार् ! --आम्हि तयां हंसणार् ? ५

आम्हि तरल विचार् आम्हि विरल विचार्,
उंच मानवां नेणार् देवरूप त्यां देणार् !
जगिं पूर्णता येणार् उणें कांहिं नुरणार् !
मूलशक्ति विश्वाधार् "धन्य !! धन्य !"—म्हणणार् ! ६

## विद्ध हरिणी

: : छंद—शुद्धसती

रानावनांतूनी कशी निसटोनी
ये माझ्या अंगणीं ही विद्ध हरिणी ? १

पाहे दीनवाणी, लोचनांत पाणी,
जणूं बोलाविते हृद्भाव दाविते ! २
रानीं पारध्यानें विंधिली बाणानें :
उरीं केला घाव घाबरला जीव ! ३
मूक ती हरिणी केवढी शहाणी !
—अंगणीं धांवून आली रानांतून ! ४
कोण मी ? – कोठला ? —ठावें काय तिला ?
सहज विश्वास वाटला तियेस ! ५
गेलों तिजपाशीं, धरिलें छातीशीं,
प्रेमें गोंजारिलें, अश्रूंस पुशिलें ! ६
खांद्यावर मान ती देई टाकून;
काळे काळे डोळे मिटून घेतले ! ७
जखम धुतली, स्नेहानें माखली,
दिलें दाणापाणी, केली शांत मनीं ! ८
लडिवाळपणें इवल्या शिंगानें
मजला खाजवी हृद्भाव दाखवी ! ९
परत माघारी पळे वनान्तरीं,
आली तशी गेली न पुन्हां दिसली ! १०

## चक्रपरिवर्तन : : जाति—दिंडी

सृष्टिरचनेचें काज सरे जेव्हां,
सभा देवांची ईश भरवि तेव्हां.
म्हणे, “ अमरांनो ! सृष्टि तुम्हां देतों :
भाग वांटुनि घ्या जया रुचे तो तो ! ” १

इंद्र वदला, “ मज हवें अंतराळ ! ”
वरुण बोले, “ मज जलनिधी विशाल ! ”

सूर्य वदला, “ ग्रहमाळ पुरे मातें ! ”
चंद्र बोले, “ द्या मला ओषधींतें ! ” २

“ दिलें हें सारें !—” ईश वदे वाणी
तोंच नियति उठे आसनावरोनी;
म्हणे, “ मनुजांवरि हवी मला सत्ता ! ”
“ दिली !—” म्हणतां विभु कोण मोद चित्ता ! ३

फिरूं लागे मग नियति--चक्र घोर
मनुज त्याखालीं होइ चूर चूर !
दीर्घ आक्रंदनिं भरति दिशा दाही
—अदय नियती परि विकट हंसत राही ! ४

## माती

: : छंद--चंद्रकांत ( बदलून )

नका, हीन लेखूं नका मातीलागून
आहे गुणनिधान !
असो असे बाहेरचा मलिन रंग
बघा आंतलें अंग !
लावण्याच्या अगणित हिच्यांत खाणी !
—कशी गिरा वाखाणी !—
याच मातीमधून
तरु--वेली फुटून
शोभा भूला ये छान !
मातीमधें निपजती कण सोन्याचे,
तसे खडे हिऱ्यांचे ! १

मलिन या मातीचीच आपली धरा
  जिचा सर्वां आसरा !
विश्वामाजी धरा आहे ही एकमेव
  जिनें निर्मिला जीव !
हीच खरी माता, हीच पोषण करी !
  —आह मृण्मय जरी !—
  जेव्हां येई मरण
  तेव्हां जाऊं आपण
  मातीमधें मिळून !
माती होतों म्हणूनच मिळूं मातीस !
  —फुका डौल कशास ? २

## तेजाची तरवार : : जाति—'धूमकेतु'

ब्राह्ममुहूर्तावरी
पूर्व दिशेनें धूमकेतुचें खड्ग घेतलें करीं !
  —तमिस्त्रा ! उगारिलें तुजवरी !

जा, अज्ञाताची गुहा जवळ तव करी,
ना तरी खड्ग हें घुसेल तुझिया उरीं !

थांब न रे लवभरी—
बघ तेजाची पेठच आतां फुटायची अंबरीं !
  —तमिस्त्रा ! पळ रे पळ सत्वरी ! १

फळ नच रेंगाळुनी :
गिरिकुहरांची, निबिड वनांची, दे आशा सोडुनी—
  —तमिस्त्रा ! तींहि उजळतिल झणीं !

तूं म्हणशिल, "राहिन निराश मानव-मनीं!"
—हें खड्ग बघुनि तरि जा तेंही विसरुनी!

पहा, पहा, भूतला
नव तेजानें नव आशेचा महापूर लोटला!
—तमिस्त्रा! न जगीं थारा तुला! २

## ख्रिस्ताचा खटला : : मुक्तछंद

चित्रकार कुणी चित्र चितारतो:
विषय चित्राचा 'ख्रिस्ताचा खटला.'
नुकताच त्यानें होता वाचलेला
वृत्तपत्रांमधें 'काळा–गोरा–वाद.'
—अनुद्बुद्ध मनीं त्या वादाचा ठसा खोल उमटला!
चित्रकार रेखी प्रसंग चित्रांत
तपशील सारे तयांत गोंवून:
रेखिली कचेरी त्यानें पिलाताची;
रेखिला पिलात उच्चासनावरी;
रेखिले यहुदी क्षुब्ध जाहलेले;
रेखिला ख्रिस्तही दोऱ्यांनीं बांधला!
काय कुंचल्याची जादु वाखाणावी! —
जसे ज्याचे भाव तसे हुबेहूब
त्याच्या मुखावरी चित्रीं चितारले:
पिलात नव्हता अनुकूल ठार कराया ख्रिस्ताला,
परी यहुद्यांच्या दडपणाखालीं तो दबला पुरा!
—लाचारीचे भाव पिलाताच्या मुखीं चित्रांत दाविले!
यहुद्यांचा तर नव्हता मावत क्षोभ अंतरंगीं!–

रोम रोम त्यांचा जणूं खवळून वदे पिलातातें,
" वधस्तंभावरी झणीं येशूलागीं खिळोनिया मारा ! "
–भाव तो तयांच्या मुखीं–आविर्भावीं–होता रेखाटला !
आणि बद्ध खिस्त !
—कोण निर्भयता !—
—कोण मनःशांति !—
क्षमेचा तर तो पुतळाच होता चित्रीं चितारला !

परंतु चित्रांत नेणतेपणानें
चित्रकार--करीं नवल घडलें :
पिलात आणिक यहुदी सकल झाले गौरवर्णी,
खिस्तच एकला मात्र कृष्णवर्णी रंगविला गेला !

## ओसाडींतील वेल : : छंद—लवंगलता (बदलून)

दूर दूर ओसाडींत वेल उगवली न कुणी पाहिली !
वेलीवरी चार पानें आकारविहीन येतात दिसून :
वाटेः त्यांतें निसर्गानें कातर आपुली न कधीं लाविली !
ही न वेल फुलवाली; न येत्या फुलांचा रंग--गंध कैंचा ?
भ्रमर न वेलीकडे कधीं झेंपावती, नच लोभावती !
कोकिळा न वेलीवरी कधींही बसून गाई गोड गान !
विहरतां रात्रीं पऱ्या तिच्या जवळून न जाती चुकून !
तिजसाठीं कल्पतरु नंदनवनांत न झुरे मनांत !
—कोण माळी वेल अशी उद्यानीं नेईल ? ---कुंडींत लावील ?
पुष्पहीन वेलीलागीं कैंचे सोपस्कार ? --काय बाडिवार ?
एक मात्र वेलीमधें गुण ये दिसून तोही घ्या ऐकून :
खोल खोल मुळें तिचीं गेलीं जमिनींत रस शोषितात !
पुरें होई जगण्याचा वेलीला आनंद नाहीं दुजा छंद !

# टीपा

[ माझ्या 'आराधना' या पहिल्या काव्यसंग्रहाची प्रथमावृत्ति १९३८-मध्यें व द्वितीयावृत्ति १९४७ मध्यें प्रसिद्ध झाली. 'अनामिका' हा दुसरा काव्यसंग्रह बराच उशिरा प्रसिद्ध होत आहे. यापुढील तिसरा काव्यसंग्रह शक्य तों लौकर प्रसिद्ध होईल.

'अनामिकें'त 'आराधने' पूर्वींच्या कविता आहेत, तशाच, तिच्या नंतरच्याहि कविता आहेत.

अनुक्रमणिकेंतील * ही खूण केलेल्या फक्त बारा कविता नियतकालिकांत वगैरे प्रसिद्ध झालेल्या असून **बाकीच्या एकोणचाळीस कविता सर्वस्वीं अप्रसिद्ध अशा आहेत**.

'संजीवन'मधील १ ते २७ कवितांना संहितेंत मथळे नाहींत. मथळ्यांची अर्थबोधास कदाचित् मदत होईल, या कल्पनेनें ते अनुक्रमणिकेंत दिले आहे त

कविता चार विभाग कल्पून त्यांत विभागल्या आहेत. त्यांत कालानुक्रम साधलेला नाहीं.

कवितांचीं छंदोनामें कै. पटवर्धनांच्या 'छंदोरचने'च्या द्वितीयावृत्तीवरून दिलेलीं आहेत. मीं दिलेलीं नवीं नांवें '  ' अशा एकेरी अवतरण–चिन्हांत नमूद केलीं आहेत. ]

**'संजीवन'** — कल्पित भावकथा. कथानक प्राय: नसल्यानें कथनपर तंत्राऐवजीं भावगीतपर तंत्र वापरलें आहे. स्वतंत्रपणें पाहिलें, तरी प्रत्येक भावगीत सलग व स्वयंपूर्ण वाटेल.

निरपेक्ष, उदात्त प्रेमहि स्वामित्व --Possession– भावनेंत परिणत होतें, हा मानवी स्वभावविशेष या काव्याचा वर्ण्यविषय होय. उठावासाठीं काव्यांत विशिष्ट घटना मुद्दाम आणल्या आहेत: कसलीहि आशा नसतां व त्यांतहि अपघात वा तत्सम आघात यामुळें 'जाण्याचा समय' आल्याचें नायकास वाटत असतां त्याच्या जीवनांत प्रेयसी येते (क्र. ८). ही प्रेयसी पाषाणमूर्तीच्या —ध्येयाच्या— मागें असल्यानें ती वश होण्याचा आरंभीं तरी संभव

नव्हता (क्र. १०). आशा नसतां प्रेयसी जीवनांत येणें व आशा नसतांच ती अखेर वश होणें— या अनपेक्षित घटना घडल्यानें नायक तेवढ्यावर संतुष्ट असावयास पाहिजे होता, त्याच्या मनांत स्वामित्वभावना निर्माण व्हावयास नको होती, असें सहजच वाटतें. पण मानवी स्वभाव तसें होऊं देत नाहीं ! 'सहजीवन— चिरमीलन' न लाभल्याबद्दल नायक कुरकुरत असतो, म्हणजेच त्याच्या मनांत स्वामित्वभावना उत्पन्न झालेली असते !

—वरील संदर्भानें काव्य वाचल्यास त्यांतील सुटलेले वा अस्पष्ट असलेले दुवे वाचकांस कल्पनेनें जाणून घेतां येणें कठीण नाहीं.

कांहीं भावगीतांतून नायकाचें सौंदर्य, प्रेम, जीवित— वगैरे विषयींचें तत्त्वज्ञान प्रगट झालें आहे.

क्रमांक ५— 'सर्व प्रिय वस्तूंची शिराणी' या अर्थानें 'प्रेय' शब्द वापरला आहे. कठोपनिषत् व त्यावरील शांकरभाष्य यांत या शब्दाला जो हीन अर्थ चिकटविला आहे, त्याच्या उलट म्हणजे अत्युच्च अर्थानें हा शब्द येथें वापरला आहे. पुढें क्र. २७ पहा.

क्र. १०— 'बादल' छंदाचा छंदोलेख असा—

॥ तपस्विनी — मंदिरीं ॥

॥ ४ + ३ ॥

'ध्यास' कवितेचाहि हाच छंद आहे.

क्र. १९— 'साद' छंदाचा छंदोलेख असा—

॥ प्रीति वसते मनांत मनांत ॥

॥ ८ + ३ ॥

'**पतिता.**'— बायबल, नवा करार, सेंट् जॉन, प्र. ८ यावरून फेरफारानें

'**गडावरील पुनव**'— माळव्यांतील मंडू गड प्रत्यक्ष पाहून या कवितेची कल्पना सुचली.

'पुनव' हा मुळांत बंगाली छंद असावा. मला बंगाली येत नाहीं, पण हिंदी मासिकांतील एका लेखामधील अवतरणावरून हा छंद माहित झाला. त्याचा छंदोलेख असा—

॥ मंडू गड माळव्यांत सकळिकां अवगत ॥

॥ ८ + ८ ॥

॥ पहाया ये एक मुशाफिर ॥

॥ १० ॥

**'क्षमा'**— महंमद पैगंबरानें बयाच्या साठाव्या वर्षी हिवाळयांत मक्केंतील 'कुरेश' जमातीवर स्वारी केली, पण तिजवर सूड न उगवितां शेवटीं तिला क्षमाच केली! — महंमदाच्या आयुष्यांतील हा सर्वांत भव्योदात्त प्रसंग आहे.

ओळ ३१— 'खदिजा' ही महंमदाची पहिली व सर्वप्रमुख बायको.

ओ. ६१— 'अबू सुफियान' हा कुरेशांचा प्रमुख व महंमदाचा हाडवैरी.

ओ. ८८— या प्राचीन ३६० मूर्ति होत्या.

**'अमृतकुंभ'**— यांतील अक्षरसंख्याक मुक्तछंदांत प्रतिचरणीं पांच अक्षरी आवर्तनें हवीं तितकीं येतात. मधून मधून विरामाचें तीन अक्षरी आवर्तन येतें. तिसऱ्या चरणाचा छंदोलेख असा—

॥ सांगतों तीच । रसिकजनां । कवनीं ॥

॥ ५ + ५ + ३ ॥

हाच मुक्तछंद 'तीन आवाज' व 'विचारांचें बंड' या कवितांत आला आहे

**'आदिनारी'**— आदिमानवांतील यम मृत्यु पावला असतां त्या दुःखानें यमीहि मृत्युवश होऊं नये, म्हणून पृथ्वीवर रात्र निर्माण होण्याची आवश्यकता उत्पन्न होते. या योजनेला देवराज वरुण व त्यांतहि त्याचा सेनानी इंद्र अनुकूल करून घ्यावयाचा असतो. यामुळें विवस्वताच्या प्रेरणेनें द्युलोकांत अप्सरा 'आदिनारी' नाटक करतात. अपेक्षेप्रमाणें इंद्राची अनुकूलता प्राप्त होते!

नाट्यकाव्यास ऋग्वेद, मंडल १०, व मैत्रायणी संहिता यांचा आधार असला, तथापि संविधानक बव्हंशीं काल्पनिकच आहे.

पुढील स्थळीं आलेल्या विधानांस 'ज्ञानकोशां'तील 'वेदविद्या' ग्रंथाचा आधार आहे—

ओ. १०, ३२—वरुणानें रात्र निर्माण केली—पान २८७.

ओ. १३ — वरुण हा देवांचा राजा होता—पा. २८६.

ओ. १४—वरुणाचा इंद्र सेनानी होता—पा. २६८. म्हणून त्याला ‘युद्धदेव’ म्हटलें आहे.

ओ. १९ (उत्तरार्ध) — इंद्र व गंधर्व यांचें शत्रुत्व होतें– पा. २७४.

ओ. ३९– यम व यमी या जुळयांतील फक्त यमच मर्त्य होता– पा. ३९४

ओ. १३३– इंद्रास सोम फार प्रिय होता —पा. २७२.

**‘तीन आवाज’**— तेजोमेघ = Nebulae.

**‘मृत्युकिरण’**— या नभोनाटयांत कोणताहि विशिष्ट देश वा तेथील हुकूमशहा अभिप्रेत नाहीं ! कथानक काल्पनिक आहे.

‘मुक्तशैली’ म्हणजे ‘आवर्तनरहित आंदोलनयुक्त’ रचना. हिंदींतील मुक्तछंद मुक्तशैलीसारखाच आहे व गुजरातींतील मुक्तछंदहि तसाच असावा. त्यांच्या मानानें मराठींतील मुक्तछंद ‘बंधनयुक्त’च वाटतो ! गुजरातींतील ‘डोलनशैली’ शब्दावरून ‘मुक्तशैली’ शब्द सुचलेला दिसतो. भावी मराठी काव्य मुक्तछंदाची पुढील पायरी म्हणून मुक्तशैलीचा अवलंब करणार, असें स्पष्ट दिसतें !

‘कुत्र्याची तंगडी’ व ‘स्वप्नदृश्य’ कविता मुक्तशैलींतच आहेत.

**‘कुत्र्याची तंगडी’**— स्वगतक = Monologue.

**‘विचारांचें बंड’**— हें नाटयकाव्य व ‘विचारांचें गाणें’ कविता हीं जोडीनें वाचावीं, म्हणजे अर्थबोधास मदत होईल.

**‘होतांच उजळ आभाळ !’**— रचनाकाल १९२५. मुंबई-पुण्याकडील कांहीं गायक–गायिका ही कविता गातात व तींत पाठभेद घुसल्याचेंहि निदर्शनास आलें, म्हणून ती मासिकांत प्रसिद्ध केली होती.

**‘उग्र हो !’**— महात्मा गांधी यांच्या १९४२ च्या आंदोलनाच्या वेळीं लिहिलेली कविता.

**‘आशा’**— ग्रीक पुराणांतील ‘पँडोरा’ हिच्या कथेवरून सुचलेली, पण भिन्न कल्पना असलेली कविता.

मुखपृष्ठावर स्त्रीच्या दोन हातांत करंडक दाखविला आहे. तें दृश्य ‘पँडोरा’ हिच्या अत्युत्कृष्ट पुतळयावरून घेतलें आहे.

'**तेजाची तरवार**'— १९४८ च्या हिंवाळ्यांत ब्राह्ममुहूर्तावर पाहिलेल्या धूमकेतूवरून सुचलेली कविता. हा धूमकेतु तरवारीसारखा भासला होता.

'धूमकेतु' जाति 'छंदोरचनें'तील 'नव तरुणी' व 'सुंदर यादव' जातींपेक्षां निराळी आहे.

'**ख्रिस्ताचा खटला**'—बायबल, नवा करार, यांतील ख्रिस्ताच्या खटल्याचें वर्णन पहा.

'पिलात' हा येशूला शिक्षा फर्माविणारा रोमन सुभेदार.

या कवितेचा मुक्तछंद फक्त सहाच अक्षरी आवर्तनांचा आहे. 'आराधनें'-तील 'दिव्य भवितव्य' कविता पहा.

REFBK-0007837
REFBK-0007837
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 6636